
9011861035
श्रीराम बझार
किराणा । ड्रायफ्रुड्स । मसाले । घरगुती वस्तु । कॉस्मेटिक्स

सिद्धीविनायक मंदिर समोर, काळाराम मंदिर रोड, श्रीरामपूर

दैनिक राष्ट्रसह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रु. ५.००। अंक २५

। मंगळवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

आदित्य रिन्यूएबल एनर्जी
(सोलर प्रोजेक्ट)
पी.एम. सुर्यघर योजना
रू.७८,०००/- अनुदान,
शासकिय बँकेचे ५.७५% दराने कर्ज
तात्काळ जागेवरच मंजूर

२००५ पासून ग्राहकसेवेत
प्रकाश घुगे : ९४२३७८५९६५ ऑफिस : ९८५०७१६४०६
श्रीरामपूर : नगरपालिका हॉस्पिटल समोर, श्रीरामपूर

अहिल्यानगर । जळगाव । धुळे । नंदुरबार । छत्रपती संभाजीनगर । जालना । बीड । धाराशिव । लातूर । नांदेड । परभणी । हिंगोली । अमरावती । अकोला । यवतमाळ । बुलढाणा । वाशिम । नागपूर । वर्धा । भंडारा । गोंदिया । चंद्रपूर । गडचिरोली । मुंबई । ठाणे । पालघर । रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग । पुणे । सातारा । सांगली । कोल्हापूर । सोलापूर । नाशिक

महत्वाचे...

शरद पवारांची प्रकृती खालावली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर येत आहे. शरद पवार यांना प्रकृती अस्वस्थामुळे पुण्याच्या रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांच्या कन्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली. बाबांना खोकल्याचा त्रास सुरु झाल्यामुळे पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्या सर्व वैद्यकीय चाचण्या सुरु असून प्रकृती स्थिर आहे. आपल्या प्रेम आणि शुभेच्छांसाठी धन्यवाद, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

'माझा राजकारणात कोणी शत्रू नाही...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : 'राजकारणात माझा कोणीही शत्रू नाही. पारनेरमध्येही माझे कोणाशी शत्रुत्व नाही. निवडणूक ही लोकशाहीची प्रक्रिया आहे. प्रत्येकाला मतदान मागण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाचा मलाही कोणताही मोह नाही. थोरात आणि विखे एकत्र आले ते केवळ सहकारासाठी, राजकारणासाठी नाही. सहकार क्षेत्रात पक्षीय राजकारण आणण्याची गरज नाही. या निवडणुकीत सर्वच पक्षांच्या नेत्यांनी समन्वयाची भूमिका घेतली. प्रचारादरम्यान एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप झाले नाहीत. शेतकरी आणि ठेवीदारांच्या मनात संभ्रम निर्माण होईल, असे वक्तव्य कोणीही केले नाही. आचारसंहितेचे पालन करत निवडणूक पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले. त्याबद्दल सर्व नेत्यांचे मनापासून आभार मानतो. निवडणुकीचा निकाल कोणाच्याही बाजूने लागला तरी तो स्विकारला पाहिजे. संचालक मंडळ एकत्र राहिले तरच बँकेचा विकास होईल'. **मा. डॉ. सुजय विखे पाटील**

11 बिनविरोधानंतर आज समजणार '10 का दम'!

विखे-थोरात विरुद्ध लंके-लोखंडे संघर्षात प्रतिष्ठा पणाला!

जिल्हा बँकेच्या दहा जागांसाठी शांततेत मतदान; मोजके मतदार आणि लाखांची चर्चा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या दहा जागांसाठी सोमवारी (दि. २) मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती. बँकेच्या एकूण २१ संचालकपदांपैकी ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या असून, उर्वरित दहा जागांसाठी २७ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. या निवडणुकीसाठी ३ हजार ८३७ मतदार पात्र होते. मोजके मतदार असताना पारनेर, अकोले आणि कर्जतसह काही प्रतिष्ठेच्या मतदारसंघांमध्ये लाखांची उड्डाणे उडाली.

भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहाता येथील सेंट जॉन स्कूलमधील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला. जिल्हा बँक ही शेतकरी, कष्टकरी, दूध उत्पादक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. सहकार चळवळ अधिक मजबूत व्हावी, शेतकऱ्यांचे हित जपले जावे आणि बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागाला आर्थिक आधार मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सहकार पॅनलसमोर खासदार नीलेश लंके आणि माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या परिवर्तन पॅनलचे आव्हान आहे. याशिवाय काही जागांवर स्वतंत्र राजकीय समीकरणेही पाहायला मिळत आहेत.

पारनेर सोसायटी मतदारसंघात खासदार नीलेश लंके आणि भाजपचे राहुल शिंदे पाटील यांच्यात थेट लढत झाली. राहुरीत आमदार प्राजक्त तनपुरे आणि सत्यजित कदम यांच्यात सामना रंगला. अकोलेमध्ये आमदार किरण लहामटे यांच्या विरोधात संजीवनी गायकर शिंदे यांचे आव्हान आहे. शेतीपूरक मतदारसंघात आमदार आशुतोष काळे आणि सुधीर म्हस्के यांच्यात लढत झाली. महिला राखीव, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जाती-जमाती मतदारसंघांतील लढतींकडेही लक्ष लागले आहे.

विखे-थोरात सहमती एक्स्प्रेसबाबत बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले की, सहकारात राजकारणाचे जोडे बाहेर ठेवावे लागतात. पक्षीय राजकारणात वैचारिक मतभेद असले, तरी सहकार टिकला पाहिजे. ही अनेक वर्षांची परंपरा आहे. पारनेरची जागा आम्हालाच मिळेल, अशी अपेक्षा आहे. मात्र, मतदार जो कौल देतील तो मान्य असेल. राम शिंदे यांच्याबाबत समन्वय साधण्यास उशीर झाला, असेही त्यांनी स्पष्ट केले. मतदानानंतर सर्व मतपेट्या सुरक्षित ठेवण्यात आल्या असून मंगळवारी (दि. ३) सकाळी नऊ वाजता मतमोजणी सुरू होणार आहे. विखे-थोरात सहकार पॅनल आपले वर्चस्व कायम राखणार की लंके-लोखंडे परिवर्तन पॅनल धक्का देणार, हे निकालातून स्पष्ट होईल. जिल्हा बँकेच्या सत्तेचे गणित कोणाच्या बाजूने झुकते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पालकमंत्र्यांचा लंके पॅनलला टोला

मतदानाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विरोधकांवर निशाणा साधला. ते म्हणाले, बहुतांशी जागांवर एकमत झाले, पण काही ठिकाणी होऊ शकले नाही. लोकशाही आहे. प्रत्येकाला वाटते की संधी मिळावी. जिल्हा बँक बिनविरोध व्हावी, यासाठी बाळासाहेब थोरातांपासून सुजयपर्यंत सर्वांनी मोट बांधली. यामागे संस्था टिकावी, जिल्हा बँक टिकावी, हा हेतू होता. मात्र, काहींना संस्थेमध्ये गोंधळ घालायचा आहे. हा गोंधळ आम्ही दूर करणार आहोत. जिल्हा बँकेने कधीही कोणाची जहागिरी मान्य केली नाही. बँकेत कधीच कोणाची जहागिरी नव्हती आणि तसा प्रश्नही येत नाही. गोंधळी एकत्र आले असले, तरी मतदार त्यांचा बंदोबस्त करतील, असा टोला त्यांनी खासदार नीलेश लंके आणि त्यांच्या पॅनलला लगावला.

राम शिंदेंना मदत केली, पण समन्वयाला उशीर!

भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार राम शिंदे हे विखे-थोरात सहमतीमध्ये का सहभागी होऊ शकले नाहीत, या प्रश्नावर विखे पाटील म्हणाले, राम शिंदे यांच्या जामखेडमधील जागेसाठी आपण बिनविरोध निवडीला मदत केली. कर्जतची जागाही बिनविरोध व्हावी, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र, सर्वच गोष्टी आपल्या हातात नसतात. तरीही राम शिंदे यांचे आम्हाला सहकार्य लाभले आहे. त्याबाबत कोणतीही संदिग्धता नाही.

पहिला ठराव बँकेच्या नामांतराचा!

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी जिल्हा बँकेच्या नामांतराबाबतही महत्त्वपूर्ण घोषणा केली. नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आल्यानंतर पहिला ठराव बँकेचे नाव बदलण्याचा असेल. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेऐवजी अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक असे नामकरण करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

शिर्डीच्या माजी नगराध्यक्षा सुमित्राताई कोते यांचे निधन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : शहराच्या पहिल्या महीला नगराध्यक्ष पद भूषवणाऱ्या सुमित्राताई कैलास बापू कोते (वय ६० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्या शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू गोविंदराव कोते यांच्या सुविद्य पत्नी आणि योगीराज कोते व नगरसेवक धनराज कोते यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनामुळे शिर्डी शहर व पंचक्रोशीत मोठी शोककळा पसरली आहे.

सुमित्राताई कोते यांनी आपल्या नगराध्यक्ष पदाच्या ७ वर्षाच्या काळात शिर्डी शहराचा प्रभावी पायाभूत विकास घडवून आणला होता. त्या अत्यंत मायाळू स्वभावाच्या होत्या . त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी स्मितहास्य असायचे, ज्यामुळे नागरिकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या जाण्याने शिर्डीने एक कर्तुत्ववान आणि लोकाभिमुख नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या निधनामुळे कोते परिवारावर मोठा आघात झाला असून, या दुःखात संपूर्ण शिर्डी शहर सहभागी झाले आहे. सुमित्राताई कोते यांच्या पार्थिवावर उद्या दिनांक ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता नगर-मनमाड रोडवरील १००० रूमच्या पाठीमागे अंत्यसंस्कार पार पडणार आहेत.

तोतया महिला उभी करून ४० लाखांचा जमीन घोटाळा!

बनावट आधार-पॅनकार्डच्या आधारे खरेदीखत

मुख्य सूत्रधार महिलेसह चौघांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : जमिनीचा मूळ मालक बाजूला ठेवून चक्क तोतया महिला उभी करायची, बनावट आधारकार्ड आणि पॅनकार्ड तयार करायचे आणि दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखत नोंदवून तब्बल ४० लाख रुपये हडप करायचे! श्रीगोंदा तालुक्यातील राजापूर येथे घडलेल्या या जमीन फसवणुकीच्या प्रकाराने खळबळ उडाली आहे. या प्रकरणात श्रीगोंदा पोलिसांनी मुख्य महिला आरोपीसह चौघांना अटक केली असून, न्यायालयाने अटक केलेल्या चौघांनाही दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कौशलरामरंजन सुभाष वाघ करीत आहेत.

शिरूर येथील चंद्रकांत बबन देवकर यांना आरोपींनी राजापूर येथील शेत गट क्रमांक ११५ मधील जमीन दाखवून विश्वासात घेतले. या जमिनीची मूळ मालक सुनिता पंढरीनाथ पठारे असल्याचे सांगत आरोपींनी अर्चना संजय मिसळू (रा. आंबेगाव बुद्रुक, जि. पुणे) हिला 'प्रियंका परदेशी' या नावाने तोतया जमीनमालक म्हणून उभे केले. तिच्या नावाने बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड व अन्य कागदपत्रे तयार करण्यात आली. या कागदपत्रांच्या आधारे श्रीगोंदा येथील दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखत नोंदविण्यात आले. अशा प्रकारे देवकर यांची ४० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. पोलिसांच्या तपासात गणेश अशोक टिळेकर याने आपल्या दुकानातून संगनमताने बनावट आधारकार्ड आणि पॅनकार्ड तयार करून दिल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ जमीन विक्रीच्या फसवणुकीपुरता मर्यादित नसून, बनावट ओळखपत्रे तयार करणाऱ्या नेटवर्कचाही पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

या प्रकरणात पोलिसांनी अर्चना संजय मिसळू (वय ४३, रा. आंबेगाव बुद्रुक, जि. पुणे) - तोतया महिला, बाबू उर्फ सुशिल सोपान शिवरकर (वय ३३, रा. सासवड, जि. पुणे), दशरथ बबन जानकर (वय ४१, रा. बहिरवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे), गणेश अशोक टिळेकर (वय ४७, रा. एकतपूर, ता. पुरंदर, जि. पुणे) या चार आरोपींना अटक केली आहे. अटक केलेल्या चौघांना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात फसवणुकीसाठी वापरण्यात आलेली कागदपत्रे कोणी तयार केली, ४० लाख रुपयांची रक्कम कोणाकडे गेली, या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच दुय्यम निबंधक कार्यालयातील कर्मचारी किंवा स्थानिक व्यक्तींची भूमिका आहे का, या सर्व बाबींचा पोलीस तपास सुरू आहे. या टोळीने अन्य ठिकाणीही अशाच पद्धतीने जमीन व्यवहार करून फसवणूक केली असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सासवड पोलीस ठाण्यातही संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल असल्याची माहिती आहे.

नेहमीच होतात बोगस खरेदी खत....

श्रीगोंदा दुय्यम कार्यालयाशी सलग्न असणाऱ्या काही व्यक्ती अथवा दलाल यामध्ये सामील असले पाहिजेत कारण श्रीगोंदा तालुक्यात दर महिन्यात बोगस महिला उभी करून अथवा बोगस मालक दाखवून खरेदीखत होण्याचे प्रकार वाढले असून याकडेही प्रशासनाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

राज्यातील जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोटाच्या धमक्या

ठाणे, बीड, सांगलीसह अनेक ठिकाणी खळबळ

न्यायालये तातडीने रिकामी

बॉम्बशोधक पथके तैनात

सायबर पोलिसांकडून ई-मेलचा तपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील ठाणे, सांगली, सोलापूर, सातारा, बीड, परभणी, हिंगोली यांसह अनेक जिल्ह्यांतील जिल्हा व सत्र न्यायालयांना बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देणारे ई-मेल प्राप्त झाल्याने सोमवारी राज्यभर खळबळ उडाली. धमकीची माहिती मिळताच पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव न्यायालयांच्या इमारती रिकाम्या केल्या. बॉम्बशोधक व नाशक पथकांसह श्वानपथकांनी परिसराची तपासणी सुरू केली असून सायबर पोलिसांकडून धमकीचे ई-मेल पाठवणाऱ्याचा शोध घेतला जात आहे.

ठाणे जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत ई-मेलवर सकाळी ९.४३ वाजता पंजाबी भाषेत धमकीचा संदेश प्राप्त झाला. दुपारी ३.११ वाजता स्फोट घडवण्याचा उल्लेख त्यात होता. यानंतर दोन्ही न्यायालयीन इमारती रिकाम्या करून न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि पक्षकारांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. परिसरातील आठ मजले, वाहनतळ, उपाहारगृह आणि अन्य भागांची तपासणी करण्यात आली. ठाणे परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी ही माहिती दिली. धमकीच्या ई-मेलमध्ये २७ नोव्हेंबरपर्यंत ठाणे न्यायालयात स्फोट घडवण्यासह मुंबईतील मेट्रो स्थानके आणि महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या कार्यक्रमात स्फोट घडवण्याचाही उल्लेख असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या दाव्यांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. सांगली, सोलापूर, बीड, परभणी आणि हिंगोली येथील न्यायालयांनाही अशाच स्वरूपाचे धमकीचे संदेश मिळाले. सर्व ठिकाणी न्यायालयीन कामकाज थांबवून परिसर रिकामा करण्यात आला. बीडमध्ये पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आणि न्यायालय परिसरात थांबू नये, असे आवाहन केले. दरम्यान, धमकीच्या ई-मेलमागे कोण आहे, ते कुठून पाठवण्यात आले आणि त्यात कितपत तथ्य आहे, याचा तपास गुन्हे शाखा व सायबर पोलीस करत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून राज्यभरातील न्यायालयांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

'महाराष्ट्रात सध्या कोरोनासारख्या 'झाडखाऊ' व्हायरसची लागण'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नागपूर : महाराष्ट्रात कोरोनासारख्या 'झाडखाऊ' व्हायरसची लागण झाली आहे, अशी बोचरी टीका चित्रपट अभिनेते व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या सयाजी शिंदे यांनी केली आहे. सरकारवर गंभीर आरोप करत त्यांनी कर्जतमधील प्रकल्पाविरोधात राज्यव्यापी 'सह्याद्री वाचवा' आंदोलनाची घोषणा केली आहे. ३२ हजार झाडे तोडण्यास विरोध दर्शवत राज्यभरातील नागरिकांना आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन देखील त्यांनी नागरिकांना केलं आहे. ते नागपुरात बोलत होते.

महाराष्ट्रात सध्या कोरोनासारख्या 'झाडखाऊ' व्हायरसची लागण झाली आहे, अशी टीका करत अभिनेते सयाजी शिंदे यांनी सह्याद्रीच्या संरक्षणासाठी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. कर्जत येथे प्रस्तावित प्रकल्पासाठी तब्बल ३२ हजार झाडे तोडली जाणार असल्याचा दावा करत त्यांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवला. सरकारने एकही झाड तोडले जाणार नाही, असे जाहीर करेपर्यंत आंदोलन थांबवणार नसल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा बँकेसाठी कर्जतमध्ये १०० टक्के मतदान

सेवा सोसायटीमध्ये ७५ मतदारांनी बजावला हक्क । ज्योती शिंदे की तुषार पिसाळ मंगळवारी होणार फैसला ?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : अहिल्यानगर जिल्हा बँकेसाठी कर्जत तालुक्यात सेवा सोसायटीसाठी १०० टक्के तर बिगरशेती आणि शेती पुरक मतदारसंघासाठी सरासरी ९९.५० टक्के मतदान झाले. यात सेवा सोसायटी मतदारसंघात ७५ पैकी ७५ मतदान पार पडले. तर बिगर शेती ६७ पैकी ६६ आणि शेती पूरक २८ पैकी २८ मतदारांनी आपला हक्क बजावला असल्याची माहिती सहायक निबंधक तान्हाजी टेकाळे यांनी माहिती दिली. या निवडणुकीसाठी मतदार असणारे राम शिंदे समर्थक सोमवारी सकाळी सहलीहुन थेट मतदान केंद्रावरच उतरले. राम शिंदे यांनी ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली होती.

अहिल्यानगर जिल्हा बँकेचे निवडणुकीचे बिगुल वाजल्यापासून



कर्जत तालुका मतदारसंघ संवेदनशील झाला होता. यंदा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी प्रथमताच या निवडणुकीत लक्ष घालीत सहकार क्षेत्रातील प्रस्थापित विखे-थोरात गटास आव्हान दिले. सोमवार, दि २ नोव्हेंबर रोजी जिल्हा बँकेसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीसाठी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या पॅनलच्या ज्योती शिंदे आणि विखे समर्थक असणारे मात्र यंदा अपक्ष म्हणून निवडणुकीत उतरलेले अंबादास पिसाळ यांचे पुत्र तुषार पिसाळ यांच्यात सरळ लढत पहावयास मिळाली. या निवडणुकीसाठी सोमवारी सेवा सोसायटीमध्ये १०० टक्के मतदान पार पडले असून ७५ पैकी ७५ मतदारांनी आपला हक्क बजावला. यात २० स्त्री तर ५५ पुरुषांनी मतदान केले. तर बिगर शेती आणि शेती पूरक मतदारसंघासाठी ९५ पैकी ९४ मतदारांनी मतदान केले. राम शिंदे यांनी खबरदारीचा उपाय घेत आपले मतदार तब्बल दीड महिना सहलीसाठी राज्याबाहेर नेले होते.

मतदानाच्या दिवशी हे सर्व मतदार त्यांनी थेट कर्जत जिल्हा परिषद शाळेच्या मतदान केंद्रावरच उतरवत स्वता जातीने लक्ष घालत रांगेत उभा राहून मतदान करवून घेतले. यात आपल्या उमेदवारांस कसलाही दगाफटका होणार नाही याची पुरेपूर काळजी(**पान ४ वर**)

अहिल्यानगर जिल्हा न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी : सर्वत्र पळापळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अहिल्यानगर सह राज्यातील एकाच वेळी पाच पेक्षा अधिक जिल्हा न्यायालयांना बॉमने उडून देण्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर पोलिसांची एकच धावा धाव झाली. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीने ई-मेलच्या माध्यमातून धमकी दिल्याची माहिती मिळाली आहे.

त्यानंतर पोलिसांनी जिल्हा न्यायालय परिसर रिकामा केला. आता जिल्हा न्यायालयाला कोणी धमकी दिली. याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. पोलिसांनी जिल्हा न्यायालयाच्या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. या घटनेमुळे वकील, पक्षकार, न्यायाधीश, व नागरिक यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या प्रकाराने एकच गोंधळ उडाला होता.

अहिल्यानगर जिल्हा न्यायालयाची इमारत बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल अज्ञात व्यक्तीद्वारे मिळाला. या गंभीर प्रकारानंतर खबरदारीचा उपाय म्हणून सर्व न्यायाधीश ,वकील, आणि कर्मचाऱ्यांना बाहेर काढून न्यायालयाची इमारत तातडीने रिकामी करण्यात आली.

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन तसेच तोफखाना, कोतवाली, एमआयडीसी, नगर तालुका आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी जिल्हा न्यायालय परिसरात येऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी बॉम्बशोधक व नाशक पथक घटनास्थळी दाखल करण्यात आले. संपूर्ण न्यायालय परिसराची कसून तपासणी करण्यात आली.

सायबर पोलीस या धमकीच्या ईमेलचा शोध घेत आहेत. अहिल्यानगर बरोबरच सातारा, ठाणे, सोलापूर ,हिंगोली येथील न्यायालय ही बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे.

दरम्यान हा धमकीचा प्रकार खोडसाळपणाचा असल्याची चर्चा न्यायालय आवारात सुरू होती. या प्रकारामुळे नगर शहरात एकच खळबळ उडाली असून दिवसभर या प्रकाराची नागरिकांमध्ये चर्चा सुरू होती.

धर्मध्वज उंचावला; आता व्यवस्थेची पतही उंचावू द्या!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

सिंहस्थाच्या मंगलारंभाने नाशिकमध्ये श्रद्धेचा उत्साह संचारला आहे. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत झालेला धर्मध्वजारोहण सोहळा भव्यतेचे दर्शन घडवणारा ठरला. मात्र, विश्वविक्रम, प्रसिद्धी आणि राजकीय उपस्थितीच्या झगमगाटापलीकडे सिंहस्थाच्या यशाचे खरे मोजमाप सामान्य भाविकाला मिळणाऱ्या सुविधा, सुरक्षितता आणि नाशिककरांच्या जगण्यात होणाऱ्या सकारात्मक बदलांतूनच होणार आहे.

नाशिकमध्ये गोदावरीच्या तीरावर धर्मध्वज उंचावला आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ पर्वाच्या मंगलारंभाची नांदी झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीने या ऐतिहासिक क्षणाला राष्ट्रीय प्रतिष्ठा लाभली. साधू-महंतांची उपस्थिती, शंखनाद, गोदा आरती आणि विविध धार्मिक उपक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले. मोठ्या उत्साहात झालेल्या या सोहळ्याचे स्वागतच करायला हवे. मात्र, धर्मध्वज उंचावणे म्हणजे सिंहस्थाची तयारी पूर्ण झाली, असा त्याचा अर्थ नाही. उलट, आता प्रशासनाच्या खऱ्या कामाची कसोटी सुरू झाली आहे.

सिंहस्थ हा केवळ धार्मिक सोहळा नाही. तो श्रद्धा, परंपरा, सामाजिक एकोपा आणि व्यवस्थापन क्षमतेची परीक्षा घेणारा महाकुंभ आहे. लाखो-कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचा हा विषय असल्याने त्याच्या आयोजनाला व्यापक स्वरूप असणे स्वाभाविक आहे. मात्र, या व्यापकतेत उत्सवाचा गाजावाजा आणि प्रत्यक्ष व्यवस्थेची गुणवत्ता यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. विश्वविक्रमांची नोंद होणे चांगले; पण भाविकांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, सुरक्षित घाट आणि वाहतुकीची शिस्त मिळणे त्याहून महत्त्वाचे आहे.

यंदाच्या प्रारंभिक सोहळ्यात राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. एवढ्या मोठ्या आयोजनासाठी शासनाचा सहभाग अपरिहार्य आहे. परंतु, शासनाने आयोजक आणि सुविधादाता म्हणून भूमिका बजावावी; संपूर्ण पर्वाचा केंद्रबिंदू मात्र सत्ता नसून श्रद्धा असली पाहिजे. सरकारी कार्यक्रमांची भव्यता काही तासांत उभी करता येते; पण सक्षम नागरी व्यवस्था उभारण्यासाठी नियोजन, सातत्य आणि उत्तरदायित्व आवश्यक असते. सिंहस्थाच्या निमित्ताने याच गोष्टींची अपेक्षा आहे.

नाशिककरांच्या रोजच्या जगण्याकडे पाहिले, तर विकासकामांच्या नावाखाली अनेक रस्ते खोदलेले आहेत. धूळ, वाहतूक कोंडी, अर्धवट कामे आणि पर्यायी मार्गांचा अभाव यामुळे नागरिक त्रस्त आहेत. मोठ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर शहरातील काही निवडक भागांची स्वच्छता, रंगरंगोटी आणि डागडुजी वेगाने होऊ शकते, तर सर्वसामान्य नागरिकांना रोजच्या गैरसोयींतून मुक्त करण्यासाठी तशीच तत्परता का दिसत नाही? पाहुण्यांच्या स्वागतासाठी सजलेले शहर आणि स्थानिकांच्या त्रासाकडे दुर्लक्ष करणारे प्रशासन, हे चित्र विसंगत आहे.

सिंहस्थाच्या प्रमुख अमृतस्नान पर्वण्या ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२७ मध्ये होणार आहेत. त्यामुळे प्रशासनाकडे नियोजन आणि कामे पूर्ण करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी आहे. हा वेळ केवळ घोषणा, बैठका आणि भूमिपूजनांत खर्च होता कामा नये. प्रत्येक कामाची निश्चित मुदत, त्यासाठी जबाबदार अधिकारी आणि प्रत्यक्ष प्रगती यांची माहिती सार्वजनिक झाली पाहिजे. कामांच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र देखरेख आणि नियमित आढाव्याची व्यवस्था असली पाहिजे. कारण सिंहस्थाच्या नावाखाली कोट्यवधींचा खर्च होऊनही नागरिकांच्या पदरी अर्धवट सुविधा पडल्या, तर त्याला विकास म्हणता येणार नाही.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न गोदावरीच्या स्वच्छतेचा आहे. ज्या नदीच्या तीरावर लाखो भाविक श्रद्धेने स्नान करणार आहेत, त्या नदीत सांडपाणी मिसळत असेल, तर धर्मध्वजारोहणाच्या भव्यतेला काय अर्थ उरतो? नदी स्वच्छ ठेवण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, मलनिस्सारण वाहिन्या आणि प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना प्रत्यक्ष कार्यान्वित झाल्या पाहिजेत. केवळ नदीपात्राची स्वच्छता करून किंवा काही दिवस विशेष मोहीम राबवून हा प्रश्न सुटणार नाही. गोदावरीचे प्रदूषण कायमचे रोखणे हे सिंहस्थाचे सर्वांत मोठे धार्मिक आणि पर्यावरणीय कर्तव्य मानले पाहिजे.

दुसरी कसोटी गर्दी व्यवस्थापनाची असेल. धर्मध्वजारोहणाचा सोहळा मर्यादित प्रवेश आणि नियंत्रित गर्दीत पार पडतो; मात्र अमृतस्नानाच्या दिवशी परिस्थिती पूर्णपणे वेगळी असणार आहे. वाहतूक, वाहनतळ, पायी जाणारे मार्ग, आपत्कालीन सेवा, वैद्यकीय सुविधा आणि नदीच्या पाण्याची पातळी या सर्व बाबींचा एकत्रित विचार करावा लागेल. पावसाळ्याचा कालावधी लक्षात घेता घाटांवरील सुरक्षितता अधिक महत्त्वाची ठरेल. गर्दीच्या परिस्थितीचे प्रत्यक्ष सराव, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेच्या चाचण्या आणि विविध विभागांतील समन्वय आतापासूनच सुरू झाला पाहिजे.

महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग भाविकांसाठी स्वतंत्र व सुलभ सुविधा असणेही तितकेच गरजेचे आहे. स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, आरोग्य केंद्रे, दिशादर्शक फलक आणि हरवलेल्या व्यक्तींसाठी मदत केंद्रे ही केवळ कागदावरील तरतूद न राहता प्रत्यक्षात उपलब्ध असली पाहिजेत. सिंहस्थाच्या व्यवस्थापनात एखाद्या भाविकाला झालेली गैरसोय ही केवळ प्रशासकीय त्रुटी नसते; ती लाखो लोकांच्या श्रद्धेच्या अनुभवावर परिणाम करणारी बाब असते.

या संपूर्ण नियोजनात नाशिककरांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. व्यापारी, रिक्षाचालक, वाहतूकदार, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि घाटांलगत राहणाऱ्या नागरिकांचे अनुभव प्रशासनासाठी महत्त्वाचे आहेत. त्यांच्या सूचनांमधून नियोजनातील त्रुटी वेळीच समोर येऊ शकतात. स्थानिकांना केवळ वाहतूक निर्बंध आणि नियम सांगून चालणार नाही; त्यांना आयोजनाचे भागीदार बनवावे लागेल. कारण सिंहस्थ काही दिवसांचा असला, तरी त्याचे परिणाम नाशिकच्या पुढील अनेक वर्षांच्या नागरी जीवनावर होणार आहेत.

सिंहस्थासाठी होणारा खर्च हा तात्पुरत्या सजावटीवर नव्हे, तर भविष्यातील नाशिकच्या उभारणीवर झाला पाहिजे. पर्व संपल्यानंतरही शहराला चांगले रस्ते, सक्षम सार्वजनिक वाहतूक, स्वच्छ गोदावरी, आधुनिक आरोग्य सुविधा आणि शिस्तबद्ध नागरी व्यवस्था मिळाली, तरच या आयोजनाचे खरे फलित दिसेल. अन्यथा, कोट्यवधींचा खर्च, विश्वविक्रम आणि भव्य सोहळे यांची चर्चा काही दिवस राहील; पण नागरिकांच्या पदरी पुन्हा तेच प्रश्न पडतील.

धर्मध्वज उंचावणे हा श्रद्धेचा गौरव आहे; आता त्या ध्वजाच्या उंचीइतकीच प्रशासनाच्या कामाची उंची दिसली पाहिजे. सिंहस्थाचा खरा विश्वविक्रम शंखनादाच्या आवाजात किंवा उपस्थित मान्यवरांच्या संख्येत नसणार, तर सुरक्षितपणे स्नान करून, स्वच्छ परिसरातून आणि समाधानाने घरी परतणाऱ्या प्रत्येक भाविकाच्या अनुभवात असणार आहे. श्रद्धेचा सोहळा भव्य असावा; पण व्यवस्थेचा पाया त्याहून भक्कम असला पाहिजे. धर्मध्वज उंचावला आहे, आता प्रशासनाने कार्यक्षमतेचा आणि उत्तरदायित्वाचा ध्वज उंचावण्याची वेळ आली आहे!

प्रवरा कन्या विद्या मंदिरमध्ये चिमुकल्यांचा दिवाळी उत्सव उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती, लोककला, परंपरा आणि सण-उत्सवांची ओळख नव्या पिढीला व्हावी, तसेच भारतीय संस्कृतीचे संस्कार बालमनावर रुजावेत, या उद्देशाने लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कन्या विद्या मंदिर येथील प्राथमिक विभागात 'दिवाळी उत्सव आणि दिवाळी शुभेच्छा' हा आगळावेगळा उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दिवाळीतील विविध सणांची माहिती प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आली.



वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज या सणांचे महत्त्व, त्यामागील परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांची ओळख चिमुकल्यांना करून देण्यात आली.

दिवाळीचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता सर्वांना सोबत घेऊन, पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करावा, असा संदेशही यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला. फराळ वाटप, फटाक्यांची भाजी आणि दिवाळीतील विविध पारंपरिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी दिवाळीचा प्रत्यक्ष आनंद अनुभवला. त्यामुळे शाळेतील वातावरण आनंद, उत्साह आणि चैतन्याने भारावून गेले होते.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केवळ पुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांना संस्कृती, परंपरा, चालीरीती आणि सामाजिक मूल्यांची ओळख करून देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमातून भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविण्यात आला.

यावेळी संस्थेच्या शिक्षण संचालिका लीलावती सरोदे, प्राचार्या विद्याताई घोरपडे यांच्यासह शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राथमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश देत पायरेन्समध्ये राष्ट्रीय एकता दिन साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त पायरेन्स संस्थेच्या आयबीएमए, डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक महाविद्यालय आणि पायरेन्स पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सरदार पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी देशाची एकता व अखंडता जपण्याची शपथ घेतली.



संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे-विखे पाटील यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम राबविण्यात आला. संस्थेचे सचिव व संचालक डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रा. संजय औताडे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. स्वातंत्र्यानंतर देशातील ५६० हून अधिक संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यात पटेल यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. जुनागढ आणि हैदराबाद संस्थानांच्या विलीनीकरणासाठी त्यांनी दाखविलेली मुत्सद्देगिरी, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व आजही देशासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

भारत हा विविध भाषा, धर्म आणि संस्कृतींचा देश असून राष्ट्रीय एकात्मता जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि देशाची अखंडता टिकविण्यासाठी युवा पिढीने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी, आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कल्पना साठे, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य अजमुद्दीन शेख यांच्यासह तिन्ही महाविद्यालयांचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.

वडाळा महादेव येथे विहिरीत पडून बिबट्याचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वडाळा महादेव : वडाळा महादेव परिसरातील बाळासाहेब भागवत भोंडगे यांच्या शेतातील विहिरीत पडून एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना आज उघडकीस आली. विहिरीत पडल्यामुळे बिबट्याचा मृतदेह फुगलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात एकच चर्चा सुरू झाली. घटनेची माहिती मिळताच वडाळा महादेवचे माजी सरपंच सचिन पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देऊन तातडीने पाचारण केले. त्यानंतर वनविभागाचे कानडे मेजर यांनी घटनास्थळी येऊन बिबट्याला विहिरीतून बाहेर काढण्याची कार्यवाही केली.



बिबट्याला विहिरीतून बाहेर काढल्यानंतर वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली त्याचा नियमानुसार अंत्यविधी करून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली. वन्यप्राण्याच्या मृत्यूनंतरही त्याचा सन्मान राखत अंत्यविधी पूर्ण करण्यात आला. यावेळी वनविभागाचे कानडे मेजर, माजी सरपंच सचिन पवार, दादा झिंज शेतमालक बाळासाहेब भोंडगे, देविदास भोंडगे, तात्या पवार, जालिंदर भोंडगे आदी उपस्थित होते.

दरम्यान, शेतशिवारातील विहिरींना संरक्षक कठडे किंवा योग्य सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे वन्यप्राणी तसेच इतर प्राणी विहिरीत पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी विहिरीभोवती आवश्यक सुरक्षा व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

गुरुवारी कर्मवीर शंकरराव काळे यांचे १४ वे पुण्यस्मरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : ग्रामीण विकासाचा पाया भक्कम करत शिक्षण, कृषी आणि सहकार क्षेत्रात आपल्या कार्याचा अजोड ठसा उमटविणारे माजी खासदार स्व. कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांच्या १४ व्या पुण्यस्मरणानिमित्त गुरुवार (दि.०५) रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण यांनी दिली आहे.

गुरुवारी सकाळी ९ वाजता कारखाना कार्यस्थळावरील कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यान येथे पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत ह.भ.प.उद्धव महाराज मंडलिक (सद्गुरु नारायणगिरी महाराज प्रबोधन प्रतिष्ठाण, श्री क्षेत्र नेवासा) यांचे सुश्राव्य हरिकीर्तन होणार आहे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण व समाजसेवेच्या विचारांचा वारसा पुढे घेवून जातांना स्व. कर्मवीर शंकररावजी काळे यांनी ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देवून त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रगतीची दारे खुली करतानाच कृषी आणि सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी त्यांनी अतुलनीय कार्य केले.



आदर्श विद्यालयात दिवाळीनिमित आकाश कंदिल स्पर्धा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनई/शिंगनापुर : - पानसवाडी ता.नेवासा येथील माजी खा.-स्व. तुकाराम गडाख यांचे हनुमान ग्रामीण संशोधन मंडळाचे आदर्श प्राथमिक विद्यालयात दिवाळी सणानिमित्ताने विद्यार्थ्यांनी, बालचंमुनी स्वतः बनवलीले आकाश कंदिल स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. त्यामध्ये विद्यालयातील सर्वच ९०० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी भाग घेतला. या मध्ये जून्या नव्या कल्पकतेतून अतिशय सुंदर आकाश कंदिल बनवले होते. यामुळे विद्यार्थी आपल्या घरी हेच आकाश कंदील वापरून टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवण्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसत होता. तसेच प्लास्टिक विरहित आकाशकंदीलची संख्या जास्त होती. या स्पर्धेत एलकेजी ते चौथी पर्यंत वर्गानुसार प्रथम पाच क्रमांक काढण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्षा जयश्रीताई रविराज गडाख व सचिव रविराज तुकाराम गडाख हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नामांकित वैद्यकीय क्षेत्रातील महिला डॉक्टर डॉ. सायली लिपाने, डॉ. शुभांगी घावटे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. क्षितिजा इंगळे, पत्रकार अनिता खंडागळे,माजी ग्रामपंचायत सदस्य नंदिनी कुसळकर, तसेच युनियन बँकचे अधिकारी अनिता शिंदे यांनी उपस्थित राहून विद्यार्थांनी बनवलेल्या कलाकृतीचे परीक्षण करून विजेते घोषित करण्यात आले.विजेते चिमुकल्यांचे कौतुक केले.यां स्पर्धे चे नियोजन ए. बी.दरंदले यांच्या मार्गदर्शनाखाली जाधव एम. बी. व गायवळ एस. बी. यांनी केले.

यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे आभार बेल्हेकर एम.यू. यांनी केले.

श्रीराम गणेश मंडळाच्या वतीने रिद्धी-सिद्धीसह श्रीगणेश मूर्तीची प्रतिष्ठापना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी शहरातील कासार गल्ली येथील श्रीराम हिंदू गणेशोत्सव मंडळाच्या वतीने संकष्टी चतुर्थीच्या मुहूर्तावर श्रीगणेशाच्या प्रासादिक मूर्तीसह रिद्धी-सिद्धी यंत्राची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यानिमित्त दोन दिवसांच्या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. राजस्थानमधील जौसा येथील बन्सी पहाडपूर दगडात आकर्षक कोरीवकाम करून मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपतीची प्रतिकृती असलेली मूर्ती येथे प्रतिष्ठापित करण्यात आली. मंदिराच्या उभारणी व जीर्णोद्धारासाठी सुमारे २५ लाख रुपये लोकवर्गणीतून खर्च करण्यात आले. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.मोरगाव येथील गुरु अमित प्रभुणे व सहकारी ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत धार्मिक विधी पार पडले. आमदार अक्षय कर्डिले यांनी मंदिरास भेट दिली. भाविकांना खिचडी व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शिवाजीराव ऊर्फ दादापाटील सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ गेल्या ४० वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम राबवत आहे.

वानराच्या उपस्थितीने वेधले लक्ष

धार्मिक सोहळ्यादरम्यान एका वानराने गणेशमूर्तीसमोर नतमस्तक होत भाविकांचे लक्ष वेधले. पूर्णाहुतीपर्यंत उपस्थित राहिलेल्या या वानराने रुद्रपीठातून स्वतः प्रसाद घेतल्याने हा प्रसंग भाविकांमध्ये चर्चेचा विषय ठरला.

भूमिहीन अनुसूचितच्या लाभार्थ्याला न्यायालयीन दिलासा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत लाभ मिळविण्यासाठी अर्ज करूनही दोन वर्षांपासून निर्णयाच्या प्रतीक्षेत असलेल्या भूमिहीन अनुसूचित जातीच्या लाभार्थ्याला मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिलासा दिला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी लाभार्थ्याच्या अर्जावर आठ आठवड्यांच्या आत निर्णय घ्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

माणिक नामदेव चक्रनारायण यांनी या योजनेचा लाभ मिळण्यासाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल केला होता. मात्र, संबंधित शासन यंत्रणेकडून अर्जावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात रिट याचिका क्रमांक १४१६०/२०२६ दाखल केली होती.

याचिकेच्या सुनावणीवेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. अजित बी. काळे यांनी बाजू मांडली. शासनाच्या १४ ऑगस्ट २०१८ च्या निर्णयानुसार पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणे आवश्यक असताना अर्जावर निर्णय घेतला जात नसल्याचा मुद्दा त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना कालमर्यादेत निर्णय घेण्याचे निर्देश देण्याची मागणी केली.

न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सुनावणी घेऊन याचिका निकाली काढली. प्रतिवादी क्रमांक दोन यांनी न्यायालयाच्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून आठ आठवड्यांच्या आत १० ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अर्जावर १४ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयानुसार निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले.

या आदेशामुळे भूमिहीन व वंचित घटकांच्या शासकीय योजनांशी संबंधित प्रलंबित अर्जांवर वेळेत निर्णय होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण दिलासा मिळाला आहे.

नेवासा तालुक्यात किल्ले बनवा स्पर्धा विजेत्या विद्यार्थ्यांना पालकांसमवेत ऐतिहासिक गड-किल्ल्यांची सफर : ॲड.पांडुरंग औताडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाची ओळख नव्या पिढीला व्हावी तसेच विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण व्हावी त्यांच्या कल्पकतेला वाव मिळावा या उद्देशाने नेवासा तालुक्यात किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसमवेत ऐतिहासिक गड-किल्ल्यांची प्रत्यक्ष सफर घडवून आणण्यात येणार असल्याची माहिती ॲड.पांडुरंग औताडे यांनी दिली

दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि टीव्हीमध्ये वेळ घालवण्याऐवजी पालकांच्या मार्गदर्शनाखाली ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार कराव्यात. किल्ला तयार करताना त्या गडाचा इतिहास, भौगोलिक रचना, ऐतिहासिक महत्त्व, तेथे झालेल्या लढाया आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथांची माहितीही विद्यार्थ्यांनी संकलित करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



या स्पर्धेत नेवासा तालुक्यातील इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकणार आहेत. स्पर्धेचा कालावधी ४नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर २०२६ असा आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या किल्ल्याचे जीपीएस लोकेशनसह फोटो आणि संबंधित गड-किल्ल्याची सविस्तर ऐतिहासिक माहिती व्हॉट्सॲपडरे आयोजकांकडे पाठवायची आहे. माहिती व फोटो पाठविण्याची अंतिम तारीख २१ नोव्हेंबर २०२६ आहे.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे विजेत्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसमवेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक गड-किल्ल्यांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी मिळणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वराज्याचा इतिहास, गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि शिवरायांच्या पराक्रमाची माहिती प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, तसेच पालकांनी मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या सोबत किल्ले तयार करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे

आत्मा मलिकच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव :- आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुल अँड ज्युनिअर कॉलेजच्या चार विद्यार्थ्यांची केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्यावतीने आयोजित केल्या जाणा-या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी निवड झाली. युवराज शिंदे, गौरव चिंचाणे, गुंजन चौधरी आणि प्रियंका पावरा अशी या चार विद्यार्थ्यांची नावे आहेत. येत्या १४ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे ही स्पर्धा होणार आहे.

ऊर्जा व विजेची बचत, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. गुणवत्तेच्या आधारे या विद्यार्थ्यांची या स्पर्धेसाठी निवड झाली. संस्थेच्या दृष्टीने हि मोठी उपलब्धी समजली जाते. या स्पर्धेच्या पात्रता फेरीत या विद्यार्थ्यांनी रंगांच्या प्रभावी वापरातून आणि सर्जनशील चित्रांच्या माध्यमातून ऊर्जा संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश मांडला. त्यांच्या कलात्मक अभिव्यक्तीची दखल घेत पुढील



राज्यस्तरीय फेरीसाठी त्यांची निवड करण्यात आली.

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, विश्वस्त मंडळातील सदस्य, व्यवस्थापक सुधाकर मलिक, साईनाथ वरपे, आत्मदर्शन बागडे, मीरा पटेल, प्राचार्य माणिक जाधव, मीनाक्षी काकडे, नितीन सोनवणे आदिंनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक ज्ञानेश्वर पर्वत , गोकुळ गायकवाड , निलेश सावंत , स्वप्निल पाटील, संदीप धनवटे व राहुल गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)


द•ख•ल

वृक्षरोपण करून पुण्यतिथी साजरी



सोनई : येथील पूर्वी पुण्यतिथीच्या निमित्ताने पारायण, ब्राह्मण भोजन, दानधर्म, पूजन, फोटोला हार घालणे,पुष्पगुच्छ अर्पण करणे, अन्नदान आदी धार्मिक विधी केले जात. आता सोनई येथील जुने कार्यकर्ते शरद उद्धव दरंदले यांच्या पाचव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या स्मृतीला आदरांजली म्हणून श्रीराम मंदिर प्रगणातील रामझिरा मंदिर, महादेव मंदिर परिसरात पिंपळ, वड, उंबर, कळब, पळस, अर्जुन साताड, बेल आदी विविध वृक्षाचे वृक्षरोपण करून आठवणीला उजाळा देऊन एक आठवण व सामाजिक कार्य म्हणून त्यांचा मुलगा सामाजिक कार्यकर्ते शरद दरंदले यांच्या मित्रपरिवाराने जोपासला. याप्रसंगी मित्रपरिवार उपस्थित होता, यां उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

बालग्रामच्या बालकांना खाऊचे वाट



नेवासा : तालुक्यातील भेंडे येथील जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा संतोष सोनवणे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवत गेवराई येथील बालग्राम मुलांचा सांभाळ करणाऱ्या सहारा अनायालय परिवारास भेट देत येथील मुलांना खाऊ – बिस्किटे वाटप करत आपला वाढदिवसाचा आनंद सामाजिक उपक्रमाने द्विगुणीत केला. आई संस्था संचालित येथील सहारा अनाथालय परिवाराच्या माध्यमातून (बालग्राम) वय वर्ष वयोगट ६ ते १८ वयातील अनाथ मुलांची निवासी सुविधा उपलब्ध करत शैक्षाणिक खर्च लोकसहभागातून गेल्या २० वर्षापासून निराधार शंभरच्या वर विद्यार्थ्यांना सांभाळण्याचे त्यांचे भविष्य घडविण्याचे काम बालग्राम परिवार करत आहे.

प्रवरा नदीपात्रात कोंबड्यांचे अवशेष टाकल्याने खळबळ

पाणी दूषित करण्याचा प्रकार; दोषींवर कठोर कारवाईची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बेलापूर : येथील प्रवरा नदीपात्रात अज्ञात व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात कोंबड्यांची पिसे, मुंडकी व इतर अवयव टाकल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. नदीचे पाणी दूषित होण्याची शक्यता असल्याने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर प्रदूषण नियंत्रणाच्या कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

शेतकऱ्यांना सिंचनासाठी तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग व्हावा, या उद्देशाने जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून प्रवरा नदीवरील बंधारे पूर्ण क्षमतेने भरण्यात आले आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असतानाच नदीपात्रात मांसाचे अवशेष टाकण्याचा प्रकार घडला.

सकाळी देवदर्शनासाठी जात असताना



बेलापूरचे माजी सरपंच भरत साळुंखे आणि पिंटू मुंदडा यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यांनी पत्रकार देविदास देसाई यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर देसाई, राधेश्याम अंबिलवादे आणि सचिन देवरे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात कोंबड्यांची पिसे, मुंडकी आणि इतर अवयव तरंगताना दिसले. दरम्यान, परिवार चिकन-मटण दुकानाचे मालक हुसेन पठाण यांनी सामाजिक बांधिलकीतून तातडीने दोन व्यक्तींना बोलावून नदीपात्रातील अवशेष गोळा करून त्यांची विल्हेवाट लावली.

बेलापूर परिसरात मटण, चिकन आणि मासे विक्रीची अनेक दुकाने असून, त्यांच्या अवशेषांची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याच्या तक्रारी यापूर्वीही झाल्या आहेत. ग्रामपंचायतीने संबंधित व्यावसायिकांना नोटिसाही बजावल्या आहेत. ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांनी या प्रकरणी पोलिसांना पत्र देऊन गुन्हा दाखल करण्याची आणि दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी तपास सुरू करण्याचे सांगितले असून, पुढील कारवाईबाबत माहिती मिळू शकलेली नाही.

नॅब संस्था म्हणजे श्रीरामपूरचे आनंदवन : डॉ. राजीव शिंदे

अंध बांधवांना नॅब संस्थेतर्फे २०० दिवाळी किराणा किटचे वाटप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : समाजातील वंचित घटकांसाठी बाबा आमटे यांनी आनंदवनच्या माध्यमातून केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्याच धर्तीवर अंध बांधवांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक पुनर्वसनासाठी ड. भागचंद चुडीवाल व त्यांचे कुटुंबीय कार्य करीत आहेत. त्यामुळे नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) ही संस्था म्हणजे श्रीरामपूरचे आनंदवन असल्याचे प्रतिपादन डॉ. राजीव रावसाहेब शिंदे यांनी केले. दिवाळीनिमित्त जिल्ह्यातील अंध बांधवांची दिवाळी गोड व्हावी, यासाठी श्रीरामपूर येथील नॅब अंधशाळेतर्फे २०० किराणा किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शिंदे बोलत होते. संस्थेचे मार्गदर्शक ड. बी. एफ. चुडीवाल यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी संस्थेतील सेवाभाव आणि माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण म्हणाले की, दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण करणे हीच खरी दिवाळी आहे. नॅब संस्थेचा उद्देश केवळ शिक्षण देणे नसून अंध बांधवांना स्वावलंबी बनविणे हाही आहे. ड. भागचंद चुडीवाल व त्यांचे कुटुंबीय संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सामाजिक कार्य करीत आहेत.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. बी. एफ. चुडीवाल यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याची माहिती दिली. शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक अशा तीन स्तरांवर अंध बांधवांचे पुनर्वसन करण्याचे संस्थेचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमास उपाध्यक्ष ॲड. रंगराव गुजर, सचिव ॲड. जे. एम. राठी, वैभव चुडीवाल, ॲड. सुहास चुडीवाल, संजय शहा, ॲड. किरण जऱ्हाड, सतीश कुंकूलोळ, संतोष पाटणी, वैशाली पाटणी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी अंधशाळेतील विद्यार्थ्यांनी दोरीवरील मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. तसेच ब्रेल लिपीतील लेखन, वाचन आणि अंकज्ञानाचे प्रात्यक्षिक दाखविले. सूत्रसंचालन सुनीता वडणे यांनी केले, तर आभार ॲड. जे. एम. राठी यांनी मानले.

अल्पवयीन मुलीचा विनयभंग, एकावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाण्याचे हद्दीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत पोलिसांकडून समजलेल्या माहिती नुसार दि. १४ रोजी पिडीत मुलगी ही घरी एकटी असल्याचा फायदा घेत आरोपीने बळजबरीने घरामध्ये प्रवेश करत तिच्या सोबत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तु जर या बाबत कुणाला काही सांगितले तर जिवे ठार मारील अशी धमकी देत शिवीगाळ केली. या बाबत दाखल फिर्यादी चे कलम बिएन एस कलम ७४,३३३,३५२,३५१(२)(३) तसेच बालकांचे लैगिक शोषण कायदा कलम ८/१२ प्रमाणे आरोपी संदीप गुलाबराव साळवे रा. सोनई याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव हे करत आहेत.

संजीवनीच्या साईकृष्ण शेलारची तैवानमधील दायेह विद्यापीठात निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कोपरगाव : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या संजीवनी इंजिनीअरिंग कॉलेजच्या प्रयत्नांना आणखी एक यश मिळाले आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी साईकृष्ण विकास शेलार याची तैवानमधील प्रतिष्ठित दायेह विद्यापीठात दोन महिन्यांच्या आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे.

विशेष म्हणजे, या इंटर्नशिपसाठी साईकृष्णचा प्रवास खर्च, निवास आणि इतर आवश्यक खर्च दायेह विद्यापीठाकडून पूर्णतः प्रायोजित करण्यात येणार आहे. विद्यापीठातील प्रा. डॉ. सिन-लियांग ओऊ यांच्या मार्गदर्शनाखाली तो 'आयओटी आधारित बायोमेडिकल' या आधुनिक तंत्रज्ञानविषयक विषयावर संशोधनात्मक इंटर्नशिप पूर्ण करणार आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, तैवानमधील विविध विद्यापीठांमध्ये इंटर्नशिपसाठी जाणारा साईकृष्ण हा संजीवनीचा ७५ वा विद्यार्थी ठरला आहे.

ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधनाची दारे खुली करणाऱ्या संजीवनीच्या शैक्षणिक वाटचालीतील ही आणखी एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे.

तैवानला रवाना होण्यापूर्वी संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी साईकृष्णचे अभिनंदन केले.

संगमनेरमधील दादागिरी आणि दहशतीचे दिवस संपले : आ. खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : नगरपालिका निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नसले, तरी नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होणार नाही. नगरपालिकेची सत्ता हातात नसतानाही उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी प्रयत्न केले जातील. संगमनेरमधील दादागिरी आणि दहशतीचे दिवस आता संपले आहेत. सामान्य शेतकऱ्याचा मुलगाही जनतेच्या आशीर्वादाने आमदार होऊ शकतो, हे शिवसेनेने दाखवून दिले आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

साईनगर येथे शहरातील पहिल्या महिला शिवसेना शाखेचे उद्घाटन आमदार अमोल खताळ आणि आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी आणि नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली या शाखेची स्थापना करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

आमदार खताळ म्हणाले की, साईनगर आणि मालदाड रोड परिसरातील नागरिकांच्या घरांवरील आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावून सातबारा उतारे नागरिकांच्या नावे करण्यासाठी प्रयत्न केले जातील. परिसरातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, बचत गटांना आर्थिक पाठबळ देणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहे. निवडणुकीत धनशक्तीविरुद्ध जनशक्ती अशी लढत झाली. काही ठिकाणी कमी पडलो, हे मान्य असले तरी जनतेचा विश्वास कायम राखणे महत्त्वाचे आहे. निवडणुकीतील जय-पराजयापेक्षा नागरिकांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महिलांना संघटित करून त्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा महिला शाखा स्थापनेमागील उद्देश असल्याचे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात सांगितले. नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी नगरसेविका अल्पना तांबे, सुमन शेलकर, दगाबाई धात्रक, मंदा ठोंबरे, युवती प्रमुख शिवानी आरगडे, शाखाप्रमुख अंजली बेल्हेकर, उपशाखाप्रमुख स्वाती पवार, सचिव भावना गुंजाळ, कार्याध्यक्ष गीता माकरे यांच्यासह शिवसैनिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दिवाळीनंतर शासकीय कामांसाठी विशेष शिबिर

साईनगर परिसरात दिवाळीनंतर विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेची प्रकरणे, रेशनकार्डविषयक कामे, आधारकार्डमधील दुरुस्त्या तसेच अन्य शासकीय योजनांशी संबंधित अडचणी सोडविण्यात येतील. यापूर्वी शासकीय कामांसाठी नागरिकांना मध्यस्थांची मदत घ्यावी लागत होती. आता संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांची कामे मार्गी लावली जात आहेत, असे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

गिन्हेवाडीत अवैध दारूविक्रीवर धडक कारवाई



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : वाडी-वस्त्यांवरील अवैध दारूविक्रीमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असल्याची व्यथा महिलांनी मांडल्यानंतर आमदार अमोल खताळ यांनी तातडीने दखल घेत गिन्हेवाडी येथे कारवाई केली. जनावरांच्या कडबा चाऱ्याखाली लपवून ठेवलेला देशी दारूचा साठा घारगाव पोलिसांनी जप्त केला. हिवरगाव पठारअंतर्गत गिन्हेवाडी, पायरवाडी आणि सुतारवाडी येथील आदिवासी वस्तीवरील गरीब कुटुंबांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या दिवाळीच्या आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. यावेळी महिलांनी आमदार खताळ यांच्याकडे अवैध दारूविक्रीचा प्रश्न मांडला. दारूच्या व्यसनामुळे घरातील कष्टाची कमाई व्यसनावर खर्च होत असून, मुलांचे शिक्षण, संगोपन आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. त्यामुळे अवैध दारूविक्री कायमची बंद करावी, अशी मागणी महिलांनी केली. महिलांच्या तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार खताळ यांनी घारगाव पोलिसांना तत्काळ कारवाईचे निर्देश दिले. त्यानंतर तक्रारदार महिलांसह आमदार आणि पोलिसांनी संबंधित ठिकाणी भेट दिली. यावेळी एका महिला विक्रेत्याने जनावरांच्या कडबा चाऱ्याखाली लपवून ठेवलेला देशी दारूच्या बाटल्यांचा साठा आढळून आला. पोलिसांनी हा साठा जप्त केला. दरम्यान, साकूर येथील मुख्य दारू विक्रेते शंकर खेमनर यांना हमा द्यावा लागत असल्याचे संबंधित महिला विक्रेत्याने आमदारांसमोर सांगितल्याचे समजते. या आरोपाची पोलिसांनी पडताळणी करणे आवश्यक आहे. आमदार खताळ यांच्या पुढाकाराने झालेल्या या कारवाईचे गिन्हेवाडी, पायरवाडी आणि सुतारवाडी परिसरातील महिलांनी स्वागत केले. अवैध दारूविक्रीविरोधात कायमस्वरूपी कारवाई करावी, अशी मागणीही महिलांनी केली.

शिक्षक राहुल व शितल आठरे दांपत्याची 'आयडॉल शिक्षक' उपक्रमात निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय, नावीन्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल घेत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (डउएठढ), महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'आयडॉल शिक्षक २०२६-२७' या राज्यस्तरीय उपक्रमासाठी नेवासा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव येथील आदर्श शिक्षक राहुल आठरे व राज्य आदर्श शिक्षिका शितल झरेकर-आठरे या उपक्रमशील शिक्षक दाम्पत्याची निवड झाली आहे.

गेल्या तीन वर्षापासून भालगाव शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत विद्यार्थी हितासाठी शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रयोग, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षण,मिशन आपुलकी द्वारे भौतिक सुविधा वाढ करत आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची या निवडीच्या माध्यमातून दखल घेण्यात आली आहे.

या यशाबद्दल दोन्ही शिक्षकांचे गटविकास अधिकारी संजय लखवाल, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, सरपंच मंगल खरात,उपसरपंच बाळासाहेब आहेर,विस्तार अधिकारी योगेश राणे, केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद,चेअरमन युवराज तनपुरे,पोलीस पाटील बाळकृष्ण भागवत,व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश तनपुरे,सेवानिवृत्त शिक्षक दादासाहेब खरात,सर्व व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक,ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

न्यू इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज येथे वार्षिक क्रीडा स्पर्धाचा शुभारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीरामपूर : येथील न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे वार्षिक क्रीडा स्पर्धा विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक बाळासाहेब ओझा स्कूलचे प्राचार्य दत्तात्रय घोगरे सुपरवायझर रिता जेटवा सुभाषराव वडीतके क्रीडा शिक्षक नितीन गायधने त्याचप्रमाणे पालक प्रतिनिधी म्हणून पूजा चव्हाण, नेहा चूग व अन्य शिक्षकवृंद उपस्थित होते. पुढील तीन दिवस चालणाऱ्या या क्रीडा महोत्सवात १०० मीटर धावणे २०० मीटर धावणे गोळा फेक थाळीफेक व्हॉलीबॉल बास्केटबॉल क्रिकेट बुद्धिबळ इत्यादी खेळांचा समावेश आहे.

थोरात कारखान्याकडून सभासदांना मोफत ३० किलो साखर वाटप सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा राज्याचे माजी शिक्षण व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशासाठी दिशादर्शक असलेल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने शेअर्स पूर्ण असलेल्या सभासदांना ३० किलो मोफत साखरचे वितरण सुरू झाले आहे.

कारखाना गोडाऊन मध्ये व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, संचालक संपतराव गोडगे, सौ.लताताई गायकर, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, कार्यालयीन अधीक्षक कृष्णा दिघे, भाऊसाहेब खर्डे, शेखर वाघ, ड.बाबासाहेब गायकर यांच्या उपस्थितीमध्ये संचालकांना मोफत साखर वितरण सुरू करण्यात आले.

माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली थोरात कारखान्याने कायम सभासद, शेतकरी,ऊस उत्पादक कामगार यांचे हित जोपासले आहे. दिवाळीनिमित्ताने कार्यक्षेत्रातील उसासाठी २०० रुपये अनुदान दिले असून कामगारांना २०% बोनस व तीस दिवसांचे सानूगृह अनुदान आहे. तर ३० सप्टेंबर २०२६ अखेर शेअर्स पूर्ण असलेल्या सर्व सभासदांना ३० किलो मोफत साखर वाटप करण्यात आली आहे. गोडाऊन क्रमांक १२ व १३ मध्ये तीन दिवस सुरू राहणार आहे.

यावेळी बोलताना पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, कारखान्याने कायम सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, सभासद यांचा विचार केला आहे. दिवाळीच्या निमित्ताने कारखान्याने १ लाख मे. टनाचे गाळपही आज पूर्ण केले असल्याने हा आनंदाचा दिवस आहे. यामध्ये सर्वांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे हि ते म्हणाले. तर सभासदांनी आपली साखर कारखाना कार्यस्थळावर येऊन घेऊन जावे असे आवाहनही त्यांनी केले.

सोनई-हिंगोणी रस्त्याची दुरवस्था; वाहनचालक त्रस्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : सोनई ते हिंगोणी या रस्त्याची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे आणि उखडलेले डांबरीकरण यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यावरून दररोज प्रवास करणारे नागरिक, दुचाकीस्वार, शेतकरी आणि विद्यार्थी यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून, दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. पावसाळ्यात या समस्येत आणखी भर पडली होती. सोनई-हिंगोणी हा परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा रस्ता आहे. मात्र, रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने खड्डे बुजवावेत तसेच रस्त्याचे दर्जेदार डांबरीकरण करावे, अशी मागणी वाहनचालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

विभागीय थलेटिक्स स्पर्धेत डॉ. विखे पाटील सैनिक स्कूलची दमदार कामगिरी

तीन कॅडेट्सची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



लोणी : पुणे येथे आयोजित विभागीय स्तरावरील शालेय थलेटिक्स स्पर्धेत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूल, लोणीच्या कॅडेट्सनी चमकदार कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत पदकांची कमाई केली. या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर शाळेच्या तीन कॅडेट्सची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली अशी माहीती प्राचार्य राजेश माघाडे यांनी दिली.

स्पर्धेत कॅडेट आदित्य कुमार सिंह याने २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक, तर १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत कांस्यपदक पटकावले.

तिहेरी उडी या प्रकारात १७ वर्षांखालील गटात कॅडेट रुद्रप्रताप जाधव, तर १९ वर्षांखालील गटात कॅडेट भूषण ढोबळे यांनी रौप्यपदकांची कमाई करत राज्यस्तरीय स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले.

याशिवाय ४ ÷ ४०० मीटर रिले स्पर्धेत सैनिक स्कूलच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत सांघिक खेळातील समन्वय आणि जिद्दीचे दर्शन घडवले.

कॅडेट्सनी मिळवलेले हे यश नियमित सराव, कठोर परिश्रम आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, कमांडंट कर्नल सुभाष घोडगेरी, प्राचार्य राजेश माघाडे, क्रीडा प्रशिक्षक प्रशांत देशमुख तसेच शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले.

पान १ वरुन

जिल्हा बँकेसाठी कर्जतमध्ये १०० टक्के मतदान.

राम शिंदेंनी घेतली. तर विरोधी उमेदवार असणारे तुषार पिसाळ यांच्यासाठी विखे समर्थक असणारे माजी संचालक अंबादास पिसाळ यांनी आपल्या पुत्रासाठी विजयाची समीकरणे बसवत चुरशीची लढत दिली असल्याचे चित्र पहावयास मिळाले. पिसाळ विरोधी गटास सुरंग लावण्यात पटाईत असून यंदा ते काय चमत्कार घडवतात हे पाहणे महत्वपूर्ण ठरणार आहे. त्यांच्या विजयासाठी विखे पिता-पुत्रांसह माजीमंत्री बाळासाहेब थोरात आणि कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी सहकार्य केले आहे. यात कोण बाजी मारणार ते मंगळवारी कळेल. राम शिंदे यांनी ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली होती. सदरच्या निवडणुकीसाठी पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

टोपी चमत्कार करणार की ? शिंदेंची रणनीती पिसाळांची हॅट्रिक रोखणार विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी विखे समर्थक अंबादास पिसाळ यांच्या विरोधात चक्रव्यूह रचत तब्बल ४५ आणि नंतर आणखी विरोधी गटाचे मतदार सहलीवर नेत त्यांना जिल्हा बँकेच्या निवडणुकीत एकाकी पाडले. तसेच कर्जतमध्ये विखे पिता-पुत्र आणि माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांना पाय ठेवू दिला नाही. त्यामुळे राम शिंदे समर्थक ज्योती शिंदे यांचे पारडे या निवडणुकीत जड वाटते. मात्र अंबादास पिसाळ यांनी जिल्हा बँकेत अनेकदा चमत्कार घडवत आपली टोपी कायम राखली हा इतिहास आहे. यावेळी सुद्धा ते काय चमत्कार घडवतात की ? यावर तालुयात पैंजा लागल्या आहेत.

कोणी येवू.... विजय मात्र भाजपाचा पक्का कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघात यंदा राम शिंदे यांनी जातीने लक्ष घालत प्रतिष्ठेची लढाई केली. त्यांच्यातील अनेक जेष्ठ उमेदवार डावळत त्यांनी आपले मत ज्योती शिंदेंच्या पारड्यात टाकत उमेदवारी दिली. तर विखे-थोरात आणि रोहित पवारांनी अंबादास पिसाळ यांच्यावर विश्वास टाकत तुषार पिसाळ रिंगणात उतरवले. पिसाळ राधाकृष्ण विखे यांचे कट्टर समर्थक मात्र त्यांनी पॅनलमध्ये उभा न राहता अपक्ष उमेदवारी केली. त्यामुळे पिसाळ किंवा शिंदे यांचा विजयापेक्षा भाजपचाच संचालक जिल्हा बँकेत जाणार हे कार्यकर्ते अभिमानाने सांगतात.

दुष्काळाचा उसाला फटका; उत्पादनात ४० टक्के घट

दिपक बरकसे । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : ज्या हिरव्यागार उसाच्या शेतातून शेतकरी वर्षभराच्या उत्पन्नाची स्वप्ने पाहत होता, त्याच उसाची दुष्काळाने वाढ खुंटवली आहे.पावसाने पाठ फिरवली, विहिरींची पाणीपातळी खालावली आणि सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळाले नाही. परिणामी, वैजापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. महिनोन्महिने पीक जोपासूनही अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा मावळू लागली आहे.यंदा तालुक्यात ऊस उत्पादनात सुमारे ४० टक्क्यांची घट झाल्याचा अंदाज असून, दुष्काळाच्या झळा आता साखर कारखानदारीलाही बसू लागल्या आहेत. ऊस हे मोठ्या प्रमाणात पाणी लागणारे पीक आहे. मात्र, पाण्याअभावी यंदा उसाची अपेक्षित वाढ झालेली नाही. पाण्याचा ताण बसल्याने कांड्यांची लांबी व जाडी कमी राहिली, फुटव्यांची वाढ खुंटली आणि उसाचे वजन घटले.लागवड, खते, औषधे आणि मजुरीसाठी खर्च करूनही उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांसमोर खर्च भरून काढण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.



महालगाव येथील पंचगंगा साखर कारखाना.

वजनामुळे शेतकरी –

ऊस वजनातील पारदर्शकतेसाठी पंचगंगा साखर कारखान्याने घेतलेल्या पुढाकाराची दखल आता शासनालाही घ्यावी लागली.ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वजनाबाबत विश्वास मिळावा,या उद्देशाने कारखान्याने अन्य ठिकाणीही वजनाची पडताळणी करण्याची भूमिका घेतली आहे. या निर्णयामुळे ऊस वजनातील पारदर्शकतेचा मुद्दा चर्चेत आला असून,शेतकऱ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून पंचगंगालाच पसंती देत आहे.

गाळप हंगामाबाबत चिंता–

महालगाव येथील पंचगंगा साखर कारखान्यात आतापर्यंत एक लाख ४० हजार मेट्रिक टन उसाचे गाळप झाले आहे. मात्र,दुष्काळामुळे ऊस उत्पादन घटल्याने कारखान्याला उपलब्ध होणाऱ्या उसावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाचा गाळप हंगाम फेब्रुवारी महिन्यापर्यंतच सुरू राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.गाळपाचा कालावधी कमी झाल्यास ऊसतोड मजूर, वाहतूकदार आणि संबंधित व्यवसायांनाही त्याचा फटका बसू शकतो.

भाव देऊन साथ देऊ–

''पाणी मिळत नसल्याने ऊस वाळून चालला आहे.त्यात साखर उताराही कमी येत आहे. दुष्काळामुळे पाण्याची परिस्थिती गंभीर बनली आहे.या संकटात शेतकऱ्यांसोबत उभे राहून लढावेच लागेल.ऊसाला चांगला भाव देऊन शेतकऱ्यांना साथ देण्याची आमची भूमिका आहे.''

प्रभाकर उत्तमराव शिंदे,
चेअरमन,
पंचगंगा साखर कारखाना

बुळेपठारच्या रस्त्यांची दुरवस्था

रस्त्याअभावी पाण्याचा टँकरही गावात पोहोचणे कठीण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

म्हैसगाव : राहुरी तालुक्यातील चिखलठाण परिसरातील बुळेपठार या महसुली गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, १३४० लोकसंख्येच्या गावाचा दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. रस्त्यांअभावी ग्रामस्थांना रोजच अडचणींचा सामना करावा लागत असून, यंदा पिण्याच्या पाण्यासाठी टँकर गावात पोहोचणार कसा, असा प्रश्नही निर्माण झाला आहे. त्यामुळे गावातील रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण जिल्हा विकास निधीतून तातडीने मंजूर करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

मौजे शेरी-चिखलठाण अंतर्गत बुळेपठार हे महसुली गाव आहे. गावाला जोडणाऱ्या कोळेवाडी शिव ते नवले वस्ती (११ किलोमीटर), बुळेपठार ते राजबेट (१३ किलोमीटर), वाळुदरा ते बुळेपठार (६ किलोमीटर) आणि झिरेदरा ते बुळेपठार (४ किलोमीटर) या रस्त्यांची कामे होणे आवश्यक आहे. मात्र, वारंवार निवेदने देऊन तसेच ग्रामसभेत ठराव करूनही या कामांना मंजुरी मिळालेली नाही.

पाण्याचा टँकर येणार कसा?

परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. गावासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची गरज असताना उंच घाटातून जाणारा रस्ता खराब असल्याने टँकर गावात पोहोचण्याबाबत साशंकता आहे. त्यामुळे पाणीटंचाईत आणखी भर पडण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

रस्त्यांच्या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन निधी मंजूर करावा, अशी मागणी मच्छिंद्र दुधवडे, रघुनाथ बुळे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अक्षय कर्डिले, तहसीलदार, गटविकास अधिकारी व जिल्हा परिषदेकडे ग्रामपंचायतीचा ठराव देऊन निवेदन सादर करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसह शेतकरी आणि रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी रस्त्यांची कामे तातडीने सुरू करावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

फराळात आर्टिफिशियल कलर चालणार नाही

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : पुण्यातील 'द पूना मर्चेंट्स चेंबर'च्या लाडू-चिवडा विक्रीला आजपासून सुरुवात झाली असून, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी खासदार श्रीनिवास पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दरम्यान, या विक्रीचे उद्घाटन करण्यापूर्वी एफडीए कडून या सगळ्या पदार्थांचे नमुने (सॅम्पल्स) घेण्यात आले होते. खाजगी लॅबच्या लोकांकडून आणि एफडीएच्या अधिकाऱ्यांकडून हे अन्नपदार्थ बनवताना गुणवत्तेविषयीच्या सर्व प्रक्रिया पार पडत आहेत का, हे तपासले जात असून या उद्घाटनानंतर एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे म्हणाले, सध्या जे नैसर्गिक (नॅचरल) रंगांचे प्रमाण आहे, त्याशिवाय कोणतीही ॲडिड किंवा आर्टिफिशियल रंग वापरू नका. नियमानुसार अनुमती असलेल्या स्वीट्समध्ये १०० पीपीएम पर्यंत रंग चालतो, आमच्या लॅब टेस्टमध्ये सर्व प्रॉडक्ट्सचे पॅरामीटर्स पास झाले असून त्यांनी क्लेम केल्याप्रमाणेच ते आहेत. सध्या यात केवळ ३० पीपीएम पर्यंतच रंग आहे, जो १०० पीपीएम च्या मर्यादेत आहे.

खेत बचाव अभियान कार्यक्रम वक्तीमध्ये संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : तालुका कृषी विभाग वैजापूरच्या वतीने तालुक्यातील वक्ती व माळीसागज येथे खेत बचाव अभियान कार्यक्रम घेण्यात आला. तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात अनेक गावांमध्ये कार्यक्रम घेण्यात आले.

महालगाव कृषी मंडळातील वक्ती व माळीसागज येथे मंडळ कृषी अधिकारी माधव गांगुर्डे यांनी खेत बचाव अभियानामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. सदरील कार्यक्रम हा २२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत राबविला जाणार असून यामध्ये माती परीक्षणानुसार संतुलित खत वापर व इतर कृषी घटकांचा वापर करणे, शेतीमध्ये तेलबिया ,कडधान्य व फलोत्पादन अभियान विविधिकरण करून उत्पन्न वाढ करणे, कापूस पिकाचे पराटी न जाळता अवशेष बारीक करून शेतात गाडणे ज्यामुळे सेंद्रिय कर्बाचे प्रमाण जमिनीत वाढेल शेतकऱ्यांना शेतीत सेंद्रिय व नैसर्गिक उत्पादनांचा वापर वाढविण्याबाबत जनजागृती, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत जलसंधारणाची उपाय यामध्ये तलावातील गाळ काढणे ,नाला खोलीकरण ,विहीर पुनर्भरण ,जलतारा, बांधबंदिस्ति राबविणे तसेच पाण्याचा शेती काटकसरीने वापर करणे ज्यामध्ये ठिबक सिंचन, तुषार सिंचन, मायक्रो स्प्रिंकलर ,मिनी स्प्रिंकलर,रेन पाईप चा वापर करून पाणी व्यवस्थापन करणे .नैसर्गिक शेतीस प्रोत्साहन देणे याविषयी सखोल मार्गदर्शन केले.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक कृषी अधिकारी राधा निकाळे, ठकाजी खेमनार, सरपंच संतोष गायकवाड ,संदीप गायकवाड ,रमेश पवार ,काकासाहेब फाळके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला गावातील साईनाथ पटारे ,राहुल गायके , बालचंद बोडके, सचिन पठारे, अशोक गुडदे ,कडू साळुंखे, अण्णासाहेब गुडदे ,चंद्रकांत साळुंखे ,संजय गुडदे, कडू गुडदे ,दत्तू गायकवाड ,दादा फाळके, अन्वर शेख, भास्कर गाडेकर कृषी सखी सुनिता गायकवाड संगीता गुडदे प्रियंका गुडदेसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवगावचे माजी सरपंच नारायणराव डहाळे यांचे निधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : शेवगाव येथील माजी सरपंच नारायणराव लक्ष्मणराव डहाळे यांचे रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे ३.३० वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच शेवगाव शहरासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून सामाजिक व राजकीय क्षेत्रातून शोकभावना व्यक्त केल्या जात आहेत.



नारायणराव डहाळे यांनी शेवगावच्या सरपंचपदाची जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्या निधनाने डहाळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे.त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी दुपारी दुपारी ०१:०० वाजता शेवगाव येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे.एका व्यक्तीचे जाणे म्हणजे केवळ एका कुटुंबाची हानी नसते, तर त्यांच्याशी जोडलेल्या अनेक आठवणींचा प्रवासही थांबतो. नारायणराव डहाळे यांच्या निधनाने डहाळे परिवारासह त्यांच्या परिचितांवर दुःखाचा प्रसंग ओढवला आहे. त्यांचे मागे तीन मुले पत्नी मुलगी कीर्ती, सुना, जावई, नातवंडे आहेत. ते सामाजिक कार्यकर्ते किरण डहाळे आणि धनंजय डहाळे शिवाजी डहाळे यांचे पिताश्री होत

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील कोथळे येथे फटाक्यांऐवजी पुस्तकांचा धमाका!

सासवड : दिवाळी म्हटले की आकाशकंदील, फराळ, रांगोळी आणि फटाक्यांची आतषबाजी डोळ्यांसमोर येते. मात्र, यंदा कोथळे परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची दिवाळी काहीशी वेगळी आणि खास ठरली. सानिध्य फाऊंडेशनने या चिमुकल्यांना बुद्धीला चालना देणारी खेळणी आणि वाचनाची गोडी लावणारी पुस्तके भेट देत खऱ्या अर्थाने 'ज्ञानाची दिवाळी' साजरी केली. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा प्रतिमा जगताप यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोथळे आणि जगताप वस्ती येथे हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. हाती नवी खेळणी आणि रंगीबेरंगी चित्रांची पुस्तके पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. अनेक मुलांनी लगेचच पुस्तके उघडून त्यातील गोष्टी आणि चित्रे पाहण्यास सुरुवात केली, तर काहींनी नव्या खेळण्यांशी खेळत आपली उत्सुकता व्यक्त केली. ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य सहज उपलब्ध होत नाही. अनेक कुटुंबांना अशा साहित्यावर खर्च करणे परवडत नाही. अशा वेळी खेळातून शिक्षण देणारी साधने आणि पुस्तके मुलांच्या सर्जनशीलतेला, विचारशक्तीला आणि वाचनसंस्कृतीला नवे बळ देतात. खेळण्यांमुळे मुलांची निरीक्षणशक्ती, एकाग्रता आणि तर्कशक्ती वाढते, तर पुस्तकांमुळे त्यांच्या कल्पनाविश्वाला नवे पंख मिळतात. मोबाइल आणि स्क्रीनच्या जमान्यात मुलांना पुन्हा पुस्तकांकडे वळविण्याचा हा प्रयत्न विशेष महत्त्वाचा ठरतो. समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणासाठी खारीचा वाटा उचलल्यास अनेक गुणवंत विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार होऊ शकतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

वैजापूरच्या उत्तर डोंगरथडीला कायमस्वरूपी पाणी द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : वैजापूर तालुक्यातील उत्तरेकडील कडील डोंगर थडी भाग म्हणून समजल्या जाणाऱ्या भागास नेहमीच दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत असून कुठलीही पाण्याची योजना या भागात नसल्याने गेल्या बारा वर्षापासून पुणेगाव दरसवाडी पाठ पाणी कृती समिती शासन दरबारी निवेदन देऊन लढा देत आहे कुठल्याही प्रकारचा ठोस निर्णय न झाल्याने सोमवार दिनांक दोन रोजी वैजापूर येथे उपविभागीय कार्यालय येथे उपविभागीय अधिकारी डॉक्टर अरुण जराड, यांना निवेदन देऊन तालुक्यातील डोंगर थडी भागाविषयी माहिती देऊन या भागात पाणी कसे आणता येईल यासंबंधी माहिती देऊन निवेदन देण्यात आले निवेदनात म्हटले आहे की उत्तर डोंगर थडी भागाकडील गावांना कायमस्वरूपाचे पाणी उपलब्ध करून पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यात यावा याशिवाय राज्य सरकारने व प्रशासनाने गांभीर्याने घेऊन कायमचा पाणी प्रश्न सोडवण्यात येईल अशी निवेदनात म्हटले आहे याशिवाय मागण्या निवेदन करण्यात आले आहे याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य तथा स्थायी समिती सदस्य संजय पाटील निकम, पुणेगाव दरसवाडी पाट पाणी कृती समितीचे अध्यक्ष दादा पाटील घायवट कार्यकारी अध्यक्ष नवी पटेल एडवोकेट रमेश सावंत ,उपाध्यक्ष गौतम संचेती, उपसभापती पती बाळा पाटील जाधव, बाळासाहेब भोसले, रामचंद्र पिल्दे जलतज्ञ, बिपिन साळे जलअभ्यासक ,उपाध्यक्ष भास्कर शिंदे सरचिटणीस, दिगंबर मतसागर,आश्रफ खान,अशोक तुपे, ताराचंद वेळंजकर ,राजेंद्र जानराव, सत्तार कुरेशी, सदाशिव जगदाळे, रावसाहेब जगदाळे, वाल्मीक मगर तुकाराम मगर ,गोरखनाथ बाळस्कर, शिवाजी जगदाळे, सुरेश जगदाळे, विजय शिंदे प्रभाकर वेळंजकर, आप्पासाहेब गायके,गणेश कटारे, श्रावण शिंदे,पोपट घायवट,देविदास बत्तासे, महेश मगर शिवनाथ घायवट, संजय जेजूरकर, सुनील घायवट, अशोक काकडे, बाबासाहेब कोलते, प्रभाकर इंगळे यांच्यासह नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते शासनाने व राज्य सरकारने याकडे गंभीरेने घेऊन योग्य ती कार्यवाही करावी नसता यापुढे वेगवेगळ्या पद्धतीची तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील निकम व नदी पटेल यांनी इशारा दिला आहे.



निधनवार्ता

अर्चना कुलकर्णी



वैजापूर : अर्चना अरुण कुलकर्णी (वय ५०, रा. सावतानगर) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन व नातवंडे असा परिवार आहे. त्या नगर परिषदेचे कर्मचारी अरुण कुलकर्णी यांच्या पत्नी व रोहन कुलकर्णी यांच्या आई होत.

संजय जाधव



सोनई : लोकप्रिय मित्रपरिवारातील शिरेगाव ता. नेवासा येथील संजय मोहनराव जाधव (वय ५४) यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन मुले, एक मुलगी, बहीण, जावई असा मोठा परिवार आहे. ते काशिनाथ जाधव, गोरक्षनाथ जाधव व एकनाथ जाधव यांचे बंधू तर शुभम जाधव व गौरव जाधव यांचे वडील होत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

मंगळवार दि. ०३ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त: ३-४

सिंगल ५-१-९ मजबुत

१२० ४३० ६७० | १५८ २४८ २२० | ३६-८४-७१-२०-४९

कल्याण

उदय-अस्त: ०-२

सिंगल ९-४-५ मजबुत

१९० २८० २२६ | १५६ १२९ ११० | ०६-३२-४८-७५-२९

मुंबैम (मेन)

उदय-अस्त: ८-१

सिंगल ४-७-९ मजबुत

१२५ २६० २३४ | १२८ १४६ १०० | ८६-२१-५४-९७-१०

माधुरी बाजार डे / नाईट

१२८ २९० ४७९ | १-१२ | १३६ ४७० ३९० | ३१-१६-२४-१०-३८

३-०-९

dpbosssss.live

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	259 60 590	590 42 228	358 62 900	400 47 890	160 70 488
03/08/2026 to 07/08/2026	234 90 690	170 85 159	338 42 129	460 09 478	370 05 348
10/08/2026 to 14/08/2026	577 99 234	230 53 148	250 70 235	355 39 133	133 76 358
17/08/2026 to 21/08/2026	240 60 460	278 73 346	116 82 480	156 23 799	449 77 179
24/08/2026 to 28/08/2026	360 96 790	255 23 229	789 42 237	450 98 440	266 41 290
31/08/2026 to 04/09/2026	149 43 670	170 81 560	159 52 336	690 50 235	577 99 135
07/09/2026 to 11/09/2026	680 47 557	228 27 124	570 26 358	112 43 779	445 33 689
14/09/2026 to 18/09/2026	789 47 124	336 20 136	799 56 178	680 42 345	399 16 790
21/09/2026 to 25/09/2026	390 25 348	457 62 129	480 23 599	166 30 479	150 60 280
28/09/2026 to 02/10/2026	669 19 135	137 18 279	260 84 257	660 29 126	369 84 770
05/10/2026 to 09/10/2026	140 57 250	459 85 168	130 48 567	469 99 126	558 84 590
12/10/2026 to 16/10/2026	160 79 568	290 11 669	122 58 189	130 46 123	257 42 480

माधुरी बाजार डे

२३८ ३५ ३४८

माधुरी बाजार नाईट

६८० ४८ १२५

Mydpboss.com

फार्मसीच्या विद्यार्थ्यांना स्टार्टअप उभारणीचे मार्गदर्शन

औषधनिर्माणशास्त्रातील ज्ञानातून उद्योजक होण्याची संधी; सासवडमध्ये 'एसपीपीयू टॉक-अप मालिका २.०'

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

सासवड : औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थ्यांना संशोधन, नवकल्पना आणि उद्योग उभारणीच्या संधींची माहिती मिळावी, या उद्देशाने पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात 'एसपीपीयू टॉक-अप मालिका २.०' हा उपक्रम आयोजित करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नावीन्य, इन्क्युबेशन व उद्योजकता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑक्टोबर रोजी हा कार्यक्रम झाला.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे माजी प्रादेशिक अधिकारी सुरेश उमाप आणि प्रुडन्स फार्मास्युटिकल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमेय देव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार आणि विद्यापीठाच्या उद्योजकता केंद्राचे सदस्य डॉ. गणेश निगडे उपस्थित होते.



उद्योगक्षेत्रातील अनुभव सांगताना उमाप आणि देव यांनी कल्पनेचे यशस्वी उद्योगात रूपांतर करण्यासाठी नियोजन, धाडसी निर्णयक्षमता, व्यावसायिक कौशल्ये आणि सातत्याने शिकण्याची तयारी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. औषधनिर्माणशास्त्रातील ज्ञानाचा उपयोग केवळ प्रयोगशाळेपुरता मर्यादित न ठेवता त्यातून नवी उत्पादने, सेवा आणि उद्योग उभारता येऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय उपकरणांच्या क्षेत्रात नवकल्पनांना मोठ्या संधी आहेत. कल्पकतेला व्यावहारिक दृष्टिकोनाची जोड दिल्यास फार्मसीचे विद्यार्थी या क्षेत्रात स्वतःचा उद्योग उभारू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्टार्टअप सुरू करताना येणारे अडथळे, त्यावरील उपाय, बाजारपेठेतील संधी तसेच योग्य मार्गदर्शन आणि संस्थात्मक पाठबळाचे महत्त्व यावरही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. कर्तिकी कदम, डॉ. स्मिता कड आणि डॉ. गणेश निगडे यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले. पाहुण्यांची ओळख श्वेता गिते यांनी करून दिली, तर सूत्रसंचालन डॉ. स्मिता कड यांनी केले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकसित करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

द•ख•ल



अहिल्यानगर : जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आज नगरमध्ये वेगळे चित्र दिसले दोन्ही पॅनलच्या उमेदवार संगीता वाघ प्रशांत लोखंडे हर्षदा काकडे यांच्यासह माजी खा. सुजय विखे आ. संग्राम जगताप, आ. अक्षय दादा कर्डिले यांनी एकत्रित हास्यविनोद करतानाचा फोटो व निवडणूक संपली की राजकारण संपले हा संदेश जनतेला दिला.

गायके मळा परिसरात महिलेचे मिनी गंठण पळविले

अहिल्यानगर : शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिला फिर्यादीला लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. फिर्यादी महिला आपल्या स्वतःच्या स्कुटीवरून घरी परतत असताना हा प्रकार घडला आहे. गायके मळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर लिंक रोड परिसरात ही संतापजनक घटना घडल्याची नोंद झाली आहे. मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी फिर्यादी महिलेला अचानक गाठले होते. दुचाकीवरून आलेल्या आरोपींनी फिर्यादी महिलेच्या गळ्यातील ९५ हजार रुपये किमतीचे १९ ग्रॅम वजनाचे मिनीगंठन बळजबरीने हिसकावून घेतले. सोनसाखळी लांबवल्यानंतर दोन्ही आरोपी आपल्या मोटारसायकलवरून सुसाट वेगाने अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे फिर्यादी महिला प्रचंड घाबरून गेली असून परिसरात खळबळ उडाली आहे. रुपाली अतुल गायके असे या प्रकरणी फिर्याद नोंदवणाऱ्या महिलेचे नाव असून ती केडगाव येथील भूषणनगर भागात राहते. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली आहे. पोलीस उपनिरीक्षक समाधान साळुंखे या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपींचा शोध घेतला जात आहे. पळून गेलेल्या दोन्ही अज्ञात चोरांना पकडण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. वारंवार घडणाऱ्या अशा चोऱ्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. लवकरात लवकर चोरांना जेरेबंद करून मुद्देमाल हस्तगत करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

शेवगाव बाजारपेठेतील रस्ता मोजणीला सुरुवात



एरंडगाव : शेवगाव शहरातील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावरील अतिक्रमणांचा प्रश्न अखेर ऐरणीवर आला असून, वंचित बहुजन आघाडीने सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. भूमिअभिलेख विभाग आणि शेवगाव नगरपरिषदेच्या संयुक्त मोजणी पथकाने सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भातसिंग चौक या मुख्य बाजारपेठेतील रस्त्याच्या मोजणीला सुरुवात केली. त्यामुळे बाजारपेठेतील अतिक्रमणधारक व्यापाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. भूमिअभिलेख विभागाकडील उपलब्ध अभिलेख, बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी सादर केलेली कागदपत्रे, नगरपरिषदेकडून नवीन बांधकाम परवाने घेताना सादर केलेले नकाशे आणि प्रत्यक्षातील बांधकामांची स्थिती यांची पडताळणी करून रस्त्याचे मोजमाप करण्यात येत आहे. यावेळी भूमिअभिलेख विभागाच्या नगर भूमापन कार्यालयाचे प्रमुख धनंजय राऊत यांनी सांगितले की, कोणत्याही व्यापारी आस्थापनेचे अथवा इमारतीचे बांधकाम रस्त्याच्या हद्दीत अतिक्रमण करून झालेले आढळल्यास त्याबाबतचा सविस्तर अहवाल नगरपरिषद प्रशासनाला सादर करण्यात येईल. नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनीही यावेळी स्पष्ट भूमिका मांडली. नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांवरील अतिक्रमणे तसेच नवीन बांधकाम परवाने घेताना कागदोपत्री सादर केलेले नकाशे आणि प्रत्यक्षात केलेले बांधकाम यामध्ये तफावत आढळल्यास नियमानुसार अतिक्रमित बांधकाम हटविण्याची कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. आवश्यकतेनुसार आठ ते तेरा फूट जागेतील अतिक्रमण हटविण्याचेही त्यांनी संकेत दिले. मोजणी पथक बाजारपेठेत दाखल होताच काही व्यापाऱ्यांनी खबरदारी म्हणून दुकाने बंद ठेवली, तर काहींनी दूर उभे राहून मोजणीच्या कामावर लक्ष ठेवले. दिवाळीच्या सणाच्या काळातच मोजणी सुरू झाल्याने अनेक व्यापाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विशेषतः रस्त्याच्या हद्दीत बांधकाम केल्याचा आरोप असलेल्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

रेशन कार्ड, धान्यासाठी नागरिकांची फरफट

रिपब्लिकन सेनेचे पुरवठा कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : शहरातील गोरगरीब व गरजू कुटुंबांना नवीन रेशन कार्ड तसेच रेशनिंगचे धान्य मिळण्यात येणाऱ्या अडचणींच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेच्या वतीने शहर अन्नधान्य पुरवठा वितरण कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यालयासमोर निदर्शने करून प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्हा महासचिव दिलीप साळवे, जिल्हा उपाध्यक्ष बाळू वाघमारे, महिला शहराध्यक्ष मंगल बरकडे, मोना घोरपडे, संगीता साठे, आशा सावंत, वैशाली शिरसाठ, रूपाली आयची, अविद्या ठोंबरे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहर अन्नधान्य पुरवठा कार्यालयात गेल्या एक ते दोन महिन्यांपासून 'सर्व्हर डाऊन आहे' असे कारण सांगून नागरिकांना वारंवार हेलपाटे मारण्यास भाग पाडले जात आहे. शहरातील गोरगरीब व गरजू नागरिक नवीन रेशन कार्ड, दुबार रेशन कार्ड तसेच नाव समाविष्ट करणे व ट्रान्सफर यांसारख्या कामांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याकरिता कार्यालयात येतात. मात्र, सर्व्हर बंद असल्याचे कारण देत त्यांना कोणतेही समाधानकारक उत्तर दिले जात नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

विशेष म्हणजे, लाभार्थ्यांचे नाव कमी करण्यासाठी अवघ्या पाच ते दहा मिनिटांत प्रक्रिया पूर्ण केली जाते; मग नवीन लाभार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज झाल्यानंतरही त्यांना रेशनिंगचे धान्य मिळण्यासाठी चार ते पाच महिने का लागतात, असा सवाल सुनील शिंदे यांनी उपस्थित केला. अनेक लाभार्थी रेशन दुकानात धान्य घेण्यासाठी गेल्यानंतर दुकानदारांकडून 'तुमचे नाव अद्याप ऑनलाइन आलेले नाही,' असे सांगितले जाते. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गोरगरीब नागरिकांच्या अन्नधान्याशी संबंधित प्रश्नांकडे पुरवठा विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन नवीन रेशन कार्ड, नाव समाविष्ट करणे तसेच धान्य वितरणातील प्रलंबित अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नांची वेळीच दखल घेतली नाही.

तर पुरवठा विभागाच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

माणुसकी कृतीने जपणे हाच धर्म

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : धर्मग्रंथांचे पारायण आणि अंधश्रद्धांवर आधारित निरर्थक कर्मकांडाचे आचरण म्हणजे धर्म नाही. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी सांगितल्यानुसार सारे कृत्रिम भेदाभेद गाडून प्रत्येकाशी माणुसकीने आणि आपुलकीने वागणे हीच अस्सल धार्मिकता असल्याचे प्रतिपादन ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी येथे केले.

देहू येथील श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष असलेल्या ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत २० वा माहेरची साडी हा उपक्रम स्नेहालय संस्थेत संपन्न झाला. देहव्यापारातील बळी, मानसिक विकारग्रस्त , शहरी आणि ग्रामीण कष्टकरी , परित्यक्ता – विधवा आणि एकल, दुर्धर आजारांनी पीडित अशा सुमारे ३५०० महिलांशी यंदा सहृदय भावांनी बहिणीचे नाते जोडले. आपल्या मानलेल्या बहिणींना नवीन साडी, दिवाळीचा फराळ, आरोग्य किट आनंदाची शिदोरी या भावांतर्फे देण्यात आली. अनामिक भावांनी जोडलेल्या या भावनिक नात्याने सर्वच महिला गहिवरल्या. देहू येथील अभंग प्रतिष्ठान आणि चाकण परिसरातील महिंद्रा लॉजिस्टिक कंपनी, तळवडे (जिल्हा पुणे) येथील ज्ञानगंगा सोशल फाउंडेशन, एम.आय.टी.एस. ग्लोबल कन्सलटन्सी सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड (मुंबई), अहिल्यानगर येथील होम रोटरी क्लब यांनी या उपक्रमासाठी बहिर्णींसाठी दिवाळी भेटींचे संकलन केले. यावेळी संत तुकाराम महाराज यांचे वंशज असलेले पुरुषोत्तम महाराज मोरे म्हणाले की, कुटुंब आणि गाव सुटलेल्या , बहुविध अत्याचारांचे घाव मन आणि शरीरावर सोसणाऱ्या महिलांसाठी मदतीपेक्षा भावनेचे नाते अनमोल असते. माणसाचा जगण्याचा आधार हा प्रेम आणि आपुलकी हाच असतो. माहेरच्या साडी या उपक्रमातील साडीसोबत येणारा नात्यांचा बंध महिलांना जगण्याची नवी उमेद देणारा आहे.

अभंग प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विकास कंद यांनी प्रास्ताविकात नमूद केले की, दोन दशकांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते असलेले निवृत्त शिक्षक धर्मराज शंकर औटी गुरुजी यांनी माहेरची साडी हा उपक्रम सुरू केला. घरोघर जाऊन कुटुंब नसलेल्या महिलांची दुःख सांगून त्यांच्याशी नाते जोडण्यासाठी त्यांनी सहृदय भाऊ शोधले. दीड वर्षांपूर्वी गुरुजींचे निधन झाले. परंतु त्यानंतर अनेक सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन हा वारसा टिकवला.

यावेळी रंजना रणनवरे, शोभा रोठे यांनी प्रातिनिधिक स्वरुपात महिलांच्या भावना व्यक्त केल्या. आपल्याला मिळालेली माहेर ची साडी म्हणजे केवळ वस्त्र नसून जगण्याची उमेद आणि नवी आशा असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी दत्तात्रय भसे, अविनाश काटे, सचिन लिंबोरे, सुषमा पवार, शशिकांत काटे, ॲड. संजय भसे, ॲड. गोरक्षनाथ टिळेकर, डॉ. विक्रम पानसंबळ, शिवाजी जाधव, नितीन थाडे, ॲड. भक्ती शिरसाठ, ॲड. आशा गोंधळे, मंगल म्हस्के आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सचिन साळुंखे, शामकांत मोरे, सचिन साळुंके, सलीम मुलाणी, रविंद्र काळोखे, गणेश भसे, निलेश मिरजकर, धनंजय काळोखे, वसंत भसे, अजिंक्य साकोरे, नुतनताई काळोखे, ज्योतीताई काळोखे, अनुजा साकोरे – झेंडे , अर्चना बोरकर, शिवाजी कराळे, सोमनाथ मोहिते, दिनेश काटे, पंकज खेडेकर आदी वंचित महिलांचे मानलेले भाऊ भाऊबीजेच्या ओवाळणीसह या कार्यक्रमाला उपस्थित होते.



केडगावचे ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांच्या दशक्रिया विधीला हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

ढोरसडे-अंत्रे सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी माळवदे, तर व्हा. चेअरमनपदी ठोंबळ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



एरंडगाव : शेवगाव तालुक्यातील ढोरसडे-अंत्रे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी दादासाहेब माळवदे, तर व्हा. चेअरमनपदी सागर ठोंबळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी व्ही. आर. चौधरी यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडली.

चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी प्रत्येकी एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने दोन्ही पदांच्या निवडी बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी चौधरी यांनी जाहीर केले. यावेळी संस्थेचे सचिव एस. आर. शेख यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी सहकार्य केले.

या निवडीनंतर माजी आ. नरेंद्र घुले, माजी आ. चंद्रशेखर घुले, माजी जिल्हाध्यक्ष राजश्री घुले तसेच डॉ. क्षितिज घुले यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी बाळासाहेब निमसे, सरस्वती जाधव, चंद्रकला गायकवाड, अशोक राऊत व सचिन हरिचंद्र माळवदे, ज्ञानदेव निमसे, चंद्रकांत आप्पासाहेब ठोंबळ, रघुनाथ माळवदे, एकनाथ किसन माळवदे, पंढरीनाथ मगर, संपत मगर, वैभव माळवदे, राधाकिसन माळवदे, कडुबाळ ठोंबळ, अप्पासाहेब ठोंबळ दीपकराव कणके, पांडुरंग पाटील माळवदे, रामकिसन तासतोडे, भारतराव वेताळ, किशोर वाघमारे, आदी उपस्थित होते.

भररस्त्यात पोलीस अधिकाऱ्याची टवाळखोरांना तंबी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



ढोरजळगाव : प्रत्येकाला आई, बहीण आहे. दुसऱ्याच्या आईला आपली आई आणि बहिणीला आपली बहीण माना, छत्रपतींची शिकवण अमलात आणा. कट्ट्यावर, हॉटेलमध्ये,बसून मुलींना त्रास दिला किंवा त्यांची छेड काढल्यास. नागडा करून मारण्याचा इशारा शेवगाव चे सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मुटेकर यांनी ढोरजळगाव येथे टवाळखोरांना दिला.

ढोरजळगाव येथे एफडीएल शिक्षण संस्थेचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय असून, ढोरजळगाव ने येथे त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय व फार्मसी कॉलेज आहे. परिसरातील मुली येथे शिक्षणासाठी येतात. गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावर तसेच महाविद्यालयाच्या आसपास मुलींच्या छेडछाडीचे प्रकार घडत आहेत. पालकांच्या व महाविद्यालयाच्या वतीने अनेक वेळा पोलीस स्टेशनला तक्रारी देखील देण्यात आल्या आहेत. याची तातडीने दखल घेत शेवगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मुटेकर यांनी ढोरजळगाव येथे भरचौकात उभा राहून सिंघम स्टाईलने टारगटांना कारवाईचा इशारा दिला. त्याचप्रमाणे हॉटेल व इतर व्यवसायिकांना देखील काही सूचना केल्या. तसेच जमलेल्या नागरिकांना अशी काही घटना घडल्यास तातडीने कळविण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. पोलीस अधिकाऱ्यांनी घेतलेल्या या भूमिकेचे यावेळी नागरिकांनी स्वागत केले. तसेच यामुळे छेडछाडीला प्रतिबंध बसेल असा आशावाद देखील व्यक्त केला.

आनंदऋषीजी हॉस्पिटलने आरोग्यसेवेचे कामधेनू म्हणून नावलौकिक मिळविला : लोढा

१२५ रुग्णांची मोफत तपासणी; गरजूंना अल्पदरात शस्त्रक्रिया व कॅन्सर उपचारांवर विशेष सवलत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : निस्वार्थ आरोग्यसेवेच्या माध्यमातून श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलने आरोग्यसेवेचे कामधेनू म्हणून नावलौकिक मिळविला आहे. या सेवाकार्यात लोढा परिवाराला योगदान देता येत असल्याचा आनंद आणि समाधान आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आरोग्यसेवेचे महत्त्वपूर्ण केंद्र बनलेल्या या हॉस्पिटलचा विस्तार आता इतर जिल्ह्यांमध्येही होत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून रुग्ण येथे उपचारासाठी येत असून, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्यसेवेची महती देशभर पोहोचत आहे, असे प्रतिपादन वसंत लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे स्व. मानकुंवरबाई हस्तिमलजी लोढा यांच्या स्मरणार्थ लोढा परिवाराच्या वतीने मोफत कॅन्सर तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वसंत लोढा बोलत होते. विशेष म्हणजे, या शिबिराचे उद्घाटन अनामप्रेम संस्थेतील अंध मुला-मुलींच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनामप्रेम संस्थेतील मुला-मुलींनी आनंदऋषीजी महाराज यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून त्यांना अभिवादन केले. तसेच आईवरील भावस्पर्शी गीत सादर करून स्व. मानकुंवरबाई यांना आदरांजली वाहण्यात आली. अंध मुला-मुलींनी सादर केलेल्या गीतांनी उपस्थितांचे मन हेलावून गेले. या भावनिक सादरीकरणामुळे अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. यावेळी लोढा परिवाराच्या वतीने अनामप्रेम संस्थेला आर्थिक मदतही देण्यात आली.

या उद्घाटन सोहळ्याला पारस लोढा, पोपट लोढा, सौ. लता लोढा, उषा लोढा, मीना लोढा, श्री विशाल गणपती देवस्थानचे अध्यक्ष ड. अभय आगरकर, अशोक कानडे यांच्यासह लोढा परिवारातील सदस्य व मित्रमंडळी उपस्थित होते. तसेच संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया यांच्यासह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य, अनामप्रेम संस्थेचे अजित माने, कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे, डॉ. तुषार मुळे, डॉ. रविंद्र मुथा, डॉ. तृप्ती पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, लोढा परिवाराने सामाजिक सेवेचे व्रत स्वीकारले असून, पिढ्यानपिढ्या त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. समाजसेवेला आपल्या कार्याचा कणा मानून हा परिवार विविध उपक्रमांमध्ये योगदान देत आहे. आईच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त लोढा परिवाराने जैन सोशल फेडरेशनच्या महावीर युनिव्हर्सिटीला मोठी देणगी दिली होती. याशिवाय अनेक मोठ्या सामाजिक प्रकल्पांमध्येही परिवाराचा हातभार लागला आहे. आईचा स्मृतिदिन सामाजिक कार्याच्या माध्यमातून साजरा करण्याचा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे हॉस्पिटलचे मुख्य उद्देश आहे. या कार्यामागे पैसा कमावणे हा उद्देश नसून, आनंदऋषीजी हॉस्पिटलने समाजाचा विश्वास संपादन केला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे यांनी सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या कॅन्सरवरील शस्त्रक्रिया केल्या जातात. त्याचबरोबर केमोथेरपीची सुविधाही उपलब्ध आहे. तंबाखू, सिगारेट यांसारख्या व्यसनांमुळे कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, लोढा परिवार समाजाशी घट्ट जोडलेला आहे. सौ. लता लोढा नगराध्यक्षा असताना आनंदऋषीजी हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. हॉस्पिटलच्या उभारणीपासूनच लोढा परिवार या आरोग्य मंदिराशी जोडला गेला असून, आरोग्यसेवेच्या कार्यात त्यांचे सातत्याने योगदान राहिले आहे.

ड. अभय आगरकर म्हणाले की, स्व. मानकुंवरबाई लोढा यांनी आपल्या मुलांवर सामाजिक सेवेचे संस्कार घडविले. आई-वडिलांकडून मिळालेला सामाजिक कार्याचा वारसा तिन्ही बंधू पुढे घेऊन जात आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलचा प्रवास समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या दिशेने सुरू आहे. दानशूर व्यक्ती आणि परिवार जेव्हा सामाजिक कार्यासाठी पुढे येतात, तेव्हाच असे मोठे समाजोपयोगी प्रकल्प उभे राहू शकतात, असे त्यांनी सांगितले.

या शिबिरात एकूण १२५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर गरजेनुसार रुग्णांवर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विविध प्रकारच्या थेरपी आणि कॅन्सर उपचारांवर विशेष सवलत देण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर प्रकाश छल्लाणी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्या

आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेऊन आवश्यक त्या उपाययोजना करा

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे प्रशासनाला निर्देश

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

मुंबई/पुणे :- बारामती शहरासह तालुक्यातील काही भागांत आज पहाटे जोरदार पावसाने हजेरी लावली. बारामती शहर परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे काही सखल भागांत, विशेषतः भिगवण रोड परिसरात पाणी साचले. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बारामतीचे उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे आणि नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून पावसाचा आणि सद्यस्थितीचा आढावा घेतला. नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची दक्षता घेऊन तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांन प्रशासनाला दिले.बारामती शहर परिसरात साधारण १५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. या जोरदार पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचले असले, तरी कोणतीही पडझड अथवा जीवित-वित्तहानी झालेली नाही. तसेच सध्या पूरस्थितीचा कोणताही धोका नसल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री पवार यांना दिली.

शहरातील भिगवण रोडसह ज्या भागांत पाणी साचले आहे, त्या ठिकाणी तातडीने पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती लवकरात लवकर पूर्वपदावर आणून जनजीवन सुरळीत सुरू राहील, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने पूर्णपणे सतर्क राहावे. आवश्यक ती आपत्कालीन यंत्रणा आणि मनुष्यबळ सज्ज ठेवावे. शहरासह तालुक्यातील पावसाच्या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. कोणत्याही परिस्थितीत स्थानिक ग्रामस्थांना, नागरिकांना तसेच प्रवाशांना त्रास होता कामा नये. त्यांच्या सुरक्षिततेला आणि जनजीवन सुरळीत ठेवण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.सेच बारामती शहर आणि तालुक्यात पावसामुळे झालेल्या संभाव्य नुकसानीची संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी. आवश्यक त्या ठिकाणी नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले. परिस्थितीवर प्रशासनाने बारकाईने लक्ष ठेवून नागरिकांना तातडीने दिलासा मिळेल, अशा पद्धतीने कार्यवाही करावी, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

द•ख•ल

सोनेसांगवी सोसायटीच्या चेअरमनपदी रमेश बोन्हाडे बिनविरोध



पाबळ : सोनेसांगवी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी रमेश बोन्हाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते चेअरमन अशोक डांगे यांनी पदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी रमेश बोन्हाडे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध पार पडली. या निवड प्रक्रियेस सोसायटीचे ११ संचालक उपस्थित होते. यावेळी दत्तात्रय कदम, अशोक डांगे, दादाभाऊ शेळके, संदीप डांगे, बबन डांगे, बजरंग सोनवणे, सौ. आशा काळे आणि सौ. गंगुबाई शेळके उपस्थित होते. हिरामण काळे यांनी सूचक, तर आनंदा टाकळकर यांनी अनुमोदक म्हणून काम पाहिले.सोसायटीचे सचिव राजू झंझाड यांनी निवड प्रक्रियेसाठी सहकार्य केले. मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ए. एच. धायगुडे यांनी काम पाहिले. रमेश बोन्हाडे यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

पूर्व आंबेगावात पावसाची हजेरी बळीराजाला दिलासा

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

लोणी धामणी : पूर्व आंबेगाव परिसरात पावसाने पाठ फिरवल्याने अनेक ठिकाणचे ओढे, नाले, विहिरी आणि तलाव कोरडे पडले होते. पाण्याअभावी शेतीची पिके करपून गेली असून, जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाईही जाणवू लागली होती. पावसाअभावी शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या अनेक शेतकरी कुटुंबांचा रोजगारही बुडाला होता. रविवारी रात्री झालेल्या पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांना काही प्रमाणात जीवदान मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही काही अंशी सुटण्यास मदत होईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. मात्र, आतापर्यंत पाण्याअभावी पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याने केवळ या पावसावर रब्बी हंगाम यशस्वी होईल, असे सांगता येणार नाही. गेल्या अनेक महिन्यांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसाने दिलासा दिला असला, तरी परिसरात समाधानकारक पाऊस होणे गरजेचे आहे. त्यामुळे निसर्गाने आणखी साथ द्यावी आणि दुष्काळाच्या संकटातून बळीराजाची सुटका व्हावी, अशी अपेक्षा पूर्व आंबेगावातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

शिक्रापूर येथील शिक्षक कॉलनीतील रस्त्याची दुरावस्था

तळेगाव ढमढेरे : शिक्रापूर (ता. शिरूर) येथील मलठण फाटा परिसरातील शिक्षक कॉलनी येथे रस्त्याची दुरावस्था झाल्याने नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असल्याने सदर रस्ता दुरुस्त करण्याची मागणी



नागरिकांनी केली आहे. शिक्रापूर (ता.शिरूर) येथील मलठण फाटा परिसरातील शिक्षक कॉलनी येथील रस्ता अनेक दिवसांपासून उखडलेला असल्याने रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहे, यापूर्वी स्थानिकांनी अनेकदा स्थानिक ग्रामपंचायत कडे पाठपुरावा करुन रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केलेली असताना सुद्धा प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. काही वेळा मुरूम टाकून तात्पुरत्या स्वरूपाची डागडुजी करण्यात आली होती मात्र सध्या सदर रस्ता पूर्णपणे नादुरुस्त झालेला असल्याने येथील रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, दुचाकी चालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे, तर रस्त्यावर पाणी साचल्याने पादचाऱ्यांची देखील मोठी कसरत होत असल्याने येथील रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिक करत आहे.


शिक्रापूर शिक्षक कॉलनी येथील रस्ता अगोदरच नादुरुस्त होता. त्यानंतर ड्रेनेजलाईनचे काम करण्यासाठी रस्ता खोदला गेल्याने रस्त्याची आणखी दुरावस्था झाली. त्यानंतर ग्रामपंचायतच्या वतीने रस्ता प्रस्तावित केलेला आहे. मात्र सध्या प्रशासक असल्याने काम करण्यास अडचण येत असल्याचे सरपंच रमेश गडदे यांनी सांगितले.

ओव्हरटेकचा प्रयत्न दोन तरुणांच्या जीवावर

मलठणमध्ये कारच्या धडकेत दोघांचा मृत्यू, चालक फरार

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

मलठण : अष्टविनायक महामार्गावर भरधाव वेगाने वाहन चालविणे आणि ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न दोन तरुणांच्या जीवावर बेतल्याची दुर्दैवी घटना मलठण (ता. शिरूर) येथे घडली. स्नेहल हॉटेलसमोर रविवारी (दि. १) रात्री पावणे नऊच्या सुमारास एर्टिगा कारने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरील दोन तरुणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावर वाहन सोडून पसार झाला.अजय बाळू देवकर (वय २८, रा. कवठे येमाई) आणि किरण अर्जुन चोरे (वय २४,



रा. डोंगरगण, चोरेवस्ती) अशी मृत तरुणांची नावे आहेत.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मलठण बाजूकडून कवठे येमाईच्या दिशेने मारुती सुझुकी एर्टिगा कार (एमएच ०३ ईएफ ६५५९) जात होती. यावेळी कारचालकाने भरधाव वेगात निष्काळजीपणे वाहन चालवत ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी समोरून येणाऱ्या होंडा युनिकॉर्न दुचाकीला कारची जोरदार धडक बसली. धडकेमुळे दुचाकीवरील दोन्ही तरुण गंभीर जखमी झाले. त्यात त्यांचा मृत्यू झाला.I घटनेतील धक्कादायक बाब म्हणजे, अपघात घडलनंतर कारचालकाने जखमींना वैद्यकीय मदत करण्याऐवजी तसेच पोलिसांना घटनेची माहिती न देता घटनास्थळावरून पळ काढला. त्यामुळे अपघातानंतर जखमींना मदत न करता पसार झालेल्या चालकाच्या वर्तनाबाबत संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी सुरेश मारुती चोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १००८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार कारचालकाचा शोध शिरूर पोलीस घेत असून, पोलीस उपनिरीक्षक खटिंग पुढील तपास करीत आहेत.या अपघातामुळे दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, अष्टविनायक महामार्गावरील भरधाव वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दिवाळीपेक्षा पावसाच्या आगमनाचा आनंद शेतकरी काही क्षण का होईना सुखावला

विनोद गोलांडे : राष्ट्र सह्याद्री

सोमेश्वरनगर : ऑक्टोबर महिन्यातील उन्हाचा चटका आणि पावसाची प्रतीक्षा यामुळे हैराण झालेल्या बारामती तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकरी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात का होईना नागरिकांना मध्यरात्री झालेल्या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला. यंदा समाधानकारक पाऊस न झाल्याने चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या आनंदापेक्षाही पाऊस पडल्याचा आनंद अधिक दिसून आला.यंदा पावसाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे न झाल्याने शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. परतीच्या पावसानेही अपेक्षित हजेरी लावली नसल्याने शेतकरी



चिंतेत होते. अशा परिस्थितीत मध्यरात्री झालेल्या पावसाने उभ्या पिकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे किमान एक वेळच्या पाण्याची गरज भागण्यास मदत होईल, अशी आशा शेतकऱ्यांना वाटत आहे. दरम्यान, हवामान खात्याने पुढील दोन दिवस पावसाचा अंदाज वर्तविल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. आणखी पाऊस झाल्यास विहिरींच्या पाणीपातळीत वाढ होऊन शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारू शकते. मात्र, यंदा पुरेसा पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिकांच्या स्थितीबाबत शेतकऱ्यांमध्ये अजूनही चिंता कायम आहे.

एका रात्रीत १५८ मिलिमीटर पाऊस?

बारामती परिसरात झालेल्या पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांना तलावाचे स्वरूप आले. पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असला, तरी अचानक झालेल्या पावसाने काही भागांत पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. एका रात्रीत १५८ मिलिमीटर पाऊस झाल्याची माहिती समोर येत आहे दिवाळीच्या सणात पावसाची प्रतीक्षा संपल्याने शेतकरी आणि नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. यंदा पावसाअभावी निर्माण झालेली पाणीटंचाई काही प्रमाणात कमी होईल, या आशेने शेतकरी आता पुढील परतीच्या पावसाकडे डोळे लावून बसले आहेत.

तेल्याभुत्याच्या कावडीने दैवतांना कऱ्हा नदीच्या पाण्याने जलाभिषेक

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

दिवे : सासवड पंचक्रोशीतील प्रथम मानाच्या तेल्याभुत्याच्या कावडीने दिवे परिसरातील दैवतांना कऱ्हा नदीच्या पाण्याने जलाभिषेक करण्यात आला. सुमारे ३५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा असलेल्या या सोहळ्यानिमित्त दिवे गावात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते. ढोल-ताशे, सनई, चौघडा आणि संबळाच्या गजरात ग्रामस्थांनी कावडीचे जल्लोषात स्वागत केले. पुरंदर तालुका पूर्वी सातत्याने दुष्काळाचा सामना करत होता. त्यावेळी दिवे पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी देवाला नवस केला होता. पंचक्रोशीतील दुष्काळ दूर झाल्यास कऱ्हा नदीच्या पाण्याने गावातील दैवतांना जलाभिषेक करण्यात येईल, असा नवस ग्रामस्थांनी केला. नवसाची पूर्तता झाल्यानंतर ही परंपरा सुरू झाली. तेव्हापासून दसऱ्यानंतर कालाष्टमीच्या मुहूर्तावर दरवर्षी दिवे ग्रामस्थ सासवड येथील कऱ्हा नदीवरून कावड घेऊन वाजत-गाजत दिवे गावात येतात आणि गावातील दैवतांना जलाभिषेक करतात. रविवारी रात्री सासवड येथून कावड घेऊन निघालेले ग्रामस्थ सोमवारी पहाटे बरोबर पाच वाजता दिवे स्टँड येथे दाखल झाले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करून कावडीचे स्वागत करण्यात आले. कावडीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात कावड श्री कातोबानाथ मंदिरात नेण्यात आली. गावातील महिलांनी ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढून कावडीचे स्वागत केले. अनेक घरांमध्ये पुरणपोळीचा नैवेद्य तयार करण्यात आला होता. महिलांनी कावडधारकांचे मनोभावे पूजन केले. श्री कातोबानाथ मंदिरात कावडीची शिखरभेट झाली. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर गावातील महादेव मंदिर, मारुती मंदिर, सटवाई माता मंदिर आणि लक्ष्मीआई मंदिर येथे कऱ्हा नदीच्या पाण्याने जलाभिषेक करण्यात आला. शेवटी चावडीसमोर पुन्हा कावडनृत्य सादर करण्यात आले. ग्रामस्थांनी कावडीच्या पाण्याने आपल्या घरातील दैवतांचेही पूजन केले. या सोहळ्यात विविध भावक्यांचे ढोल,आढाळगे मंडळाच्या सनईवादनाने, विकास गोंधळी यांच्या संबळवादनाने तसेच पवार मंडळाच्या चौघडा वादनाने विशेष रंगत आणली.अस रमेश झेंडे व सोमनाथ झेंडे यांनी सांगितले शेवटी कावडीचे पुजारी कैलास बुवा कावडे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. श्री कातोबानाथ मंदिरात आरती झाल्यानंतर या पारंपरिक सोहळ्याची सांगता झाली.



पुणे जिल्हा बँक व नाबार्डतर्फे दिवाळी महोत्सवाचे आयोजन

बचत गटांच्या ६७ स्टॉलमधून महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ; ५ नोव्हेंबरपर्यंत महोत्सव

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी महोत्सवाचे उद्घाटन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सोमवारी (ता. २) झाले. पुणे जिल्ह्यातील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे, हा या महोत्सवाचा उद्देश आहे.

या वेळी बोलताना कृषिमंत्री भरणे म्हणाले, की महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहिले पाहिजे. बचत गटांतील महिलांनी उत्पादित



केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी आवश्यक ते पाठबळ देण्याबाबत जिल्हा बँकेमार्फत निश्चितच प्रयत्न केले जातील. बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी महिलांच्या प्रगतीसाठी बचत गटांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. या महोत्सवामुळे महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीतून आर्थिक उलाढाल वाढेल आणि त्याचा फायदा महिलांचे आर्थिक स्तर उंचावण्यासाठी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी नाबार्डचे मुख्य महाव्यवस्थापक डॉ. भवानी शंकर, पुणे जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक संतोष हराळे, बँकेचे संचालक माऊली दाभाडे, रेणनाथ दरवडेकर, दत्तात्रय येळे, भालचंद्र जगताप, विकास दांगट, प्रवीण शिंदे, संभाजी होळकर, निर्मला जागडे, पूजा बुटे-पाटील, जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शितोळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महिला कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या पोवाड्याचे कौतुक करण्यात आले. तसेच बँकेच्या महिला संचालिका पूजा बुटे-पाटील, निर्मला जागडे आणि उपसरव्यवस्थापक समीर रजपूत यांनी बचत गटांतील महिलांना मार्गदर्शन केले.

५ नोव्हेंबरपर्यंत महोत्सव :

हा महोत्सव २ ते ५ नोव्हेंबरदरम्यान पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बी. जे. रोड येथील मुख्य कार्यालयात सुरू राहणार आहे. नागरिकांनी या महोत्सवाला भेट देऊन महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची खरेदी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शिरूरमध्ये नवदुर्गांचा गौरव; कर्तृत्ववान महिलांसह चिमुरडी मानवीच्या धाडसाला सलाम !

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

शिरूर : स्त्रीमध्ये असलेली जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची ताकद तिला प्रत्येक संकटावर मात करण्याचे बळ देते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी 'डेली न्यूज पोस्ट २४'च्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'नवदुर्गा सन्मान २०२६' सोहळा शिरूरमध्ये मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. यावेळी नऊ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्याबरोबरच प्रसंगावधान राखत बंदूकधारी चोरट्याचा धाडसाने प्रतिकार करणाऱ्या अवघ्या १२ वर्षांच्या मानवी उमेश छाजेड हिचाही विशेष गौरव करण्यात आला.

शिरूर येथील बाबुरावनगर परिसरातील डेक्कन एज्युकेशन इंग्लिश व सेमी इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. प्रत्येक स्त्रीमध्ये असामान्य कर्तृत्व दडलेले असते. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळतानाच विविध क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या महिलांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असते. अशा महिलांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा 'नवदुर्गा सन्मान' हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे



गौरवोद्गार नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी यावेळी काढले.

या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय यशाबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठी विषयात सुवर्णपदक प्राप्त करणाऱ्या प्रा. डॉ. क्रांती पैठणकर, ग्रामविकास, राजकारण व उद्योजकतेतील नेतृत्वाबद्दल आदर्श सरपंच वर्षा काळे, शिक्षण, अभिनय व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल प्राचार्या अश्विनी घारू, वंचितांच्या वेदना लेखणीतून मांडणाऱ्या लेखिका कविता पाचंग्रे, स्वतःच्या मेहनतीने अभिनय क्षेत्रात स्थान निर्माण करणाऱ्या अभिनेत्री प्रतीक्षा बारवकर, स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या राजमाता जिजाऊ अभ्यासिकेच्या प्रमुख प्रा. अलका बेलोटे (बोरुडे), सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवून गरजूंना मदतीचा हात देणाऱ्या जिम ट्रेनर व सामाजिक कार्यकर्त्या प्रिया बिरादार, शिक्षणाच्या माध्यमातून वंचितांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या सुनीता भोसले आणि ग्रामीण भागातून क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आरती दसगुडे या नऊ महिलांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमातील सर्वाधिक भावनिक आणि प्रेरणादायी क्षण ठरला तो चिमुरडी मानवी उमेश छाजेड हिच्या शौर्याचा गौरव. शिरूरमधील आनंदनगर वसाहतीत चोरट्याने बंदुकीसह घरात प्रवेश केला असताना अवघ्या १२ वर्षांच्या मानवीने न घाबरता प्रसंगावधान राखत चोरट्याचा प्रतिकार केला आणि वडिलांना मदत केली होती. तिच्या धाडसामुळे चोरट्याला पळ काढावा लागला होता. एवढ्या लहान वयात दाखविलेल्या या असामान्य धैर्याची दखल घेत श्रीमंत हलवाई चौक गणेश मित्र मंडळाच्या वतीने मानवीचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात तिच्या धाडसाचे कौतुक केले.

या सोहळ्यास शिरूर पंचायत समितीच्या सभापती स्वाती विठ्ठल घावटे, नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आयेशा सय्यद, पोलीस उपनिरीक्षक सीमा काळे, सामाजिक कार्यकर्त्या राणीताई चौरे, उषाताई वाखारे, नगरसेवक संतोष थेऊरकर, उमेश शेळके, शिरूर शहर विकास आघाडीचे अध्यक्ष ॲड. सुभाष पवार, प्राचार्य डॉ. समीर ओंकार, नोटरी दिलीप वारे, सेवानिवृत्त प्रा. डॉ. दीपक गायकवाड, ॲड. प्रदीप बारवकर, संतोष सांबारे, प्रकाश बाफना, प्राचार्य डॉ. अमोल शहा, महिबूब सय्यद, नितीन थोरात, श्यामकांत वर्पे, गणेश खोले, विनायक म्हसवडे, सुशांत कुटे, अभिजित आंबेकर, राजू शेख, प्रा. विलास आंबेकर, माधव मुंडे, अजिमभाई सय्यद, प्रवीण मुथा, अतुल बोथरा, विनोद बोथरा, रणजित गायकवाड, अशोक काळे, सिकंदर मण्यार, गोपीनाथ पठारे, अशोक भोसले, प्रमोद वाघचौरे, हरी शर्मा, डॉ. वैशाली साखरे, उर्मिला बारवकर, बाळासाहेब दसगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच पत्रकार धर्मा मैड, फिरोज शिकलगार, संजय तंटक, अपर्णा वाळसे, योगिता तंटक, प्रिया देसाई, अरुणा कुलकर्णी, वैशाली जोशी, सायली पटवर्धन, सृष्टी करंजुले, रोहिणी बढे, जयश्री थिटे, अमोल वाघमारे, लहू धारजे, सुनीता सरोदे, अश्विनी पिंगळे, मोनाली जाधव, प्रतिभा सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रांतील पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. सतीश धुमाळ यांनी समाजात अनेक महिला निःस्वार्थपणे काम करतात; मात्र त्यांच्या कार्याची योग्य दखल घेतली जात नाही. अशा महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देऊन त्यांच्या संघर्षाची आणि कर्तृत्वाची ओळख नव्या पिढीला करून देणे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री दांडगे यांनी केले, तर आभार माजी सरपंच वर्षा काळे यांनी मानले. डेक्कन एज्युकेशन स्कूलचे या कार्यक्रमासाठी प्रमुख माध्यम प्रायोजक म्हणून सहकार्य लाभले.नवदुर्गा सन्मान सोहळ्याच्या माध्यमातून शिरूर परिसरातील कर्तृत्ववान महिलांच्या कार्याला मिळालेली ही दाद केवळ पुरस्कारापुरती मर्यादित न राहता समाजातील इतर महिलांनाही नव्या उमेदीने पुढे जाण्याची प्रेरणा देणारी ठरली.

आळंदीतील चार पुलांना संतश्रेष्ठ भावंडांची नावे

नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते नामकरणाचे उद्घाटन

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

आळंदी : तीर्थक्षेत्र आळंदी नगरीला जोडणाऱ्या चारही प्रमुख पुलांना वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या संतश्रेष्ठ भावंडांची नावे देण्यात आली होती. या नामकरणाचा उद्घाटन सोहळा सोमवार (दि.२ नोव्हें.) रोजी उत्साहात पार पडला. यामुळे आळंदीच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या चार पुलांना अनुक्रमे श्री संत निवृत्तीनाथ महाराज पूल, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पूल, श्री संत सोपानदेव महाराज पूल आणि श्री संत मुक्ताबाई पूल अशी नावे देण्यात आली आहेत. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत या नामकरणाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, ''संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपानदेव महाराज आणि संत मुक्ताबाई या संत भावंडांनी आपल्या विचारांनी, कार्याने आणि आध्यात्मिक शिकवणुकीने समाजजीवन समृद्ध केले आहे. त्यांच्या नावांनी आळंदी नगरीतील पुलांचे नामकरण करताना मनस्वी समाधान वाटत आहे. या संतश्रेष्ठांची नावे केवळ पुलांपुरती मर्यादित न राहता त्यांच्या विचारांची आणि संस्कारांची आठवण प्रत्येक नागरिकाला व आळंदीत येणाऱ्या लाखो भाविकांना कायम होत राहील. ही नामकरणाची संकल्पना आळंदीच्या धार्मिक परंपरेचा सन्मान करणारी आहे.'' या प्रसंगी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे पाटील, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे पाटील, संतोष रासकर, सुरेश झोंबाडे, माजी नगरसेवक संतोष चोरडीया यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि आळंदीतील अनेक मान्यवर उपस्थित होते.



सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची जबाबदारी माझी : आ. कर्डिले

कापूरवाडीत ४ कोटी ३३ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडविण्याला माझे प्राधान्य असून प्रत्येक गावातील रस्ते, पाणी आणि मूलभूत सुविधांची विकासकामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यात येतील. जनतेने माझ्यावर विश्वास टाकून विधानसभेत नेतृत्व करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची जबाबदारी माझी आहे असे प्रतिपादन आमदार अक्षय कर्डिले यांनी केले.



कापूरवाडी येथे रविवार (दि. १ नोव्हेंबर) रोजी आमदार अक्षय कर्डिले यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या सुमारे ४ कोटी ३३ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा त्यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते.

नगर-बुऱ्हाणनगर-आगडगाव रस्त्याच्या मजबुतीकरण व रुंदीकरण, रोजगार हमी योजनेंतर्गत चार वस्त्यांमधील अंतर्गत रस्त्यांची कामे, जनसुविधा योजनेंतर्गत कापूरवाडी येथील विविध विकासकामे, शेंगदाणे बाबा आश्रम येथे सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच श्रीराम मंदिर सभामंडप, गावांतर्गत रस्ता काँक्रिटीकरण, जनसुविधा योजनेंतर्गत ग्रामपंचायत आवारातील परिसर सुधारणा तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत कापूरवाडी येथील तलावातील गाळ काढणे या कामांचे लोकार्पण करण्यात आले. या कामांमुळे गावातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि धार्मिक स्थळांच्या परिसराचा विकास होण्यास मदत होणार आहे.

पुढे बोलताना आमदार कर्डिले म्हणाले की, गावाच्या विकासामध्ये मुख्य रस्त्यांबरोबरच गावांतर्गत रस्ते आणि पाणंद रस्त्यांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे या रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील. आगडगाव येथील काळभैरवनाथ देवस्थान आणि शेंगदाणे बाबा देवस्थान येथे मोठ्या संख्येने भाविक येत असतात. त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी संबंधित रस्त्यांची कामे मार्गी लावण्यात येत आहेत.

जिल्हा सहकारी बँकेत शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणूनच काम करणार असून स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी सुरू केलेले उपक्रम यापुढेही सुरू ठेवणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

सचिन दुसुंगे यांनी कापूरवाडी गावामध्ये झालेले विविध विकास कामे व आवश्यक असलेल्या कामांची माहिती दिली. याप्रसंगी संदीप कर्डिले, मधुकर मगर, विलास शिंदे, गोविंदराव वाघ, दत्ता तापकिरे, हरिभाऊ कर्डिले, संतोष म्हस्के, शंकर पवार, अनिल करांडे, राजेंद्र ससे, महादेव मगर, धर्मनाथ आव्हाड, सुभाष आढाव, संभाजी वामन यांच्यासह विविध मान्यवर, पदाधिकारी, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विकासकामांच्या माध्यमातून गावाच्या प्रगतीला चालना मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

शेवगाव तालुक्यातील १५ शिक्षकांची निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

ढोरजळगांव : शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'आयडॉल शिक्षक' निवड उपक्रमांतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (डउएठढ), पुणे यांच्या वतीने प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेत अहिल्यानगर जिल्ह्यातील तब्बल २०६ शिक्षकांची निवड झाली असून, त्यामध्ये शेवगाव तालुक्यातील १५ शिक्षकांचा समावेश आहे. शिक्षकांच्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक संकल्पना, बालस्नेही अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती, शैक्षणिक गुणवत्ता, शाळा विकासासाठीचे योगदान, समाजसहभाग, विविध शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा विचार करून ही निवड प्रक्रिया राबविण्यात आली. निवड झालेल्या शिक्षकांच्या अनुभवाचा व शैक्षणिक कार्याचा उपयोग राज्यातील अन्य शाळा आणि शिक्षकांना व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. शेवगाव तालुक्यातील आदर्श गाव वाघोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेतील उपक्रमशील शिक्षिका तथा मुख्याध्यापक श्रीमती शोभा रामभाऊ मंडलिक (घुगरे) यांचीही आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे, कृतीकेंद्रीत अध्यापन पद्धती, बालस्नेही शैक्षणिक वातावरण निर्मिती आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या कार्याची दखल या निवडीच्या माध्यमातून घेण्यात आली आहे.तालुक्यातील निवड झालेल्या सर्व शिक्षकांचे केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर,गटशिक्षणाधिकारी शैलेजा राऊळ यांनी अभिनंदन केले आहे.

द•ख•ल



राजेंद्र नष्टे यांचा केअर हेल्थ इन्शुरन्स व बागल सर्विसेसच्या वतीने गौरव!

राशिन : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नुकताच आदर्श प्राचार्य पुरस्कार प्राप्त करणारे राजेंद्र नष्टे सर यांचा केअर हेल्थ इन्शुरन्स कंपनी आणि बागल सर्विसेस यांच्या वतीने कर्जत येथील लकी हॉटेलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात सन्मान करण्यात आला. बागल सर्विसेसचे प्रमुख महेंद्र बागल यांच्या विवाहनिमंत्रण सोहळ्याचे औचित्य आणि दीपावलीच्या शुभेच्छांची देवाणघेवाण करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नष्टे सरांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव करण्यात आला. तसेच उपस्थित विमा प्रतिनिधींचाही सन्मान करण्यात आला. या सोहळ्याला महेंद्र बागल, गोडसे सर, निलेश सुपेकर, महेंद्र बागल यांच्या भावी पत्नी सौ. आकांक्षा, हर्षदा नरसाळे मॅडम यांच्यासह सुमारे ५० विमा प्रतिनिधी सपत्नीक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी राजेंद्र नष्टे सरांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी महेंद्र बागल यांनी आरोग्य विम्याचे महत्त्व अधोरेखित केले. आजारपण, अपघात आणि रुग्णालयीन उपचारांमुळे सर्वसामान्य कुटुंबांवर मोठा आर्थिक भार पडतो. अशा वेळी आरोग्य विमा आर्थिक संरक्षण देण्यासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिकांनीच नव्हे, तर गरीब, गरजू आणि सर्वसामान्य कुटुंबांनीही आपल्या आर्थिक क्षमतेनुसार योग्य आरोग्य विमा संरक्षण घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कुकडी शाखाधिकारी सुनिल दाते यांचा सत्कार



निघोज : कुकडी डावा कालवा नारायणगाव विभागाचे निघोज शाखाधिकारी सुनिल दाते यांनी सोमवार दि.२ नोव्हेंबर रोजी निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेला सदिच्छा भेट दिली यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक दामुशेठ लंके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चेअरमन चंद्रकांत लामखडे, व्हा. चेअरमन अमृताशेठ रसाळ, माजी चेअरमन रामदासशेठ वरखडे, संचालक भाऊ रसाळ, भाऊ शेटे, शिवशक्ती पाणी वापर संस्थेचे चेअरमन खंडूशेठ लामखडे तसेच फलोद्यान संस्थेचे मॅनेजर रविंद्र रसाळ तसेच सभासद उपस्थित होते. कुकडी शाखाधिकारी दाते यावेळी म्हणाले की निघोज आणी परिसरातील शिवशक्ती पाणी वापर संस्था ही चंद्रकांत लामखडे, अमृताशेठ रसाळ, रामदासशेठ वरखडे, खंडूशेठ लामखडे व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली काम करीत असून अतिशय चांगले काम सुरू असून १०० टक्के वसुली तसेच सर्वच शेतकरी पाण्याची मागणी करीत असल्याने सर्वाधिक पाणी मागणी करणारी संस्था म्हणून शिवशक्ती पाणी वापर संस्थेचा नावलौकिक आहे. दि.५ नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्याचा निर्णय करण्यात आला असून शेतकऱ्यांनी मागील वर्षीची पाणीपट्टी भरुण यावर्षी रब्बी हंगामासाठी सर्वाधिक पाणी उचलण्यासाठी अर्ज दाखल करावेत असे आवाहन केले आहे.

निघोज येथे १८ वा वर्षावास सांगता समारंभ संपन्न

निघोज : आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा दरम्यान संपन्न झालेल्या वर्षावास कार्यक्रमाची सांगता रविवार दि.१ नोव्हेंबर रोजी निघोज येथील बुद्ध विहार परिसरात संपन्न झाली. गेली ९५ दिवस हा कार्यक्रम दररोज बुद्ध विहार येथे संपन्न होत होता. यामध्ये दररोज धम्मदेसणा या कार्यक्रमात दररोज व्याख्यान व प्रार्थना आयोजित करण्यात येत होती. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेत होते. दिलीप सोनवणे, अशोक जाधव, सचिन नगरे, शाम साळवे, बाबाजी वाघमारे, राधाकांत सोनवणे, गणेश सोनवणे, सुखदेव थोरात, सुनील सोनवणे, प्रदीप कसबे, सुभाष सोनवणे, राजेंद्र करंदीकर,संपत पवार सर, सुभाष गायकवाड, बबनराव सोनवणे सर, हिराभाऊ सोनवणे, कैलास सोनवणे, अशोक सोनवणे, शारदा सोनवणे, कविता जावळे, शकुंतला वाघमारे, शेवुबाई जावळे, कल्पना सोनवणे, रंजना, सोनवणे,रागीनी वाघमारे, पोर्णीमा सोनवणे, असंख्य समाजबांधव दररोज उपस्थित राहते. धम्मदेसणा स्वयंप्रकाशीत व्हा हे अभियान संपूर्ण पारनेर तालुक्यात राबवणार असल्याची माहिती राजू करंदीकर यांनी दिली आहे.

डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणजे नर्सेस : डॉ. आवारी

औषधोपचारांसोबत प्रेम, आपुलकी आणि मानसिक आधारही महत्त्वाचा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ नर्सिंग, बेल्हे (बांगरवाडी) येथे प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित 'दीक्षारंभ २०२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आळेफाटा येथील युनिक हॉस्पिटलचे बालरोग तज्ञ डॉ. आकाश आवारी यांनी डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून नर्सेसची भूमिका स्पष्ट केली. रुग्णाला औषधोपचारांबरोबरच प्रेम, आपुलकी, विश्वास आणि मानसिक आधार देणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.



डॉ. आवारी म्हणाले की, रुग्णाच्या आजाराचे निदान करून डॉक्टर उपचारांची दिशा निश्चित करतात; मात्र उपचारांची प्रभावी अंमलबजावणी, रुग्णाची नियमित काळजी, प्रकृतीतील बदलांचे निरीक्षण आणि वेळेवर औषधोपचार यामध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आजारपणात रुग्ण शारीरिक त्रासाबरोबरच मानसिक तणावातूनही जात असतो. अशा वेळी त्याच्याशी प्रेमाने संवाद साधणे, त्याला धीर देणे आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे ही नर्सची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. त्यामुळे नर्सिंग हा केवळ व्यवसाय नसून मानवतेची सेवा करण्याचा मार्ग आहे.

नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी शिस्त, अभ्यासातील सातत्य, वेळेचे नियोजन, संवादकौशल्य आणि सेवाभाव हे गुण आत्मसात करावेत. आधुनिक वैद्यकीय क्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान व उपचारपद्धती यांचे ज्ञान अद्ययावत ठेवावे. रुग्णाची सामाजिक, आर्थिक किंवा धार्मिक पार्श्वभूमी विचारात न घेता प्रत्येकाला समानतेने आणि संवेदनशीलतेने सेवा द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी पूजनाने करण्यात आली. समर्थ कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य बाबासाहेब भुतकर यांनी प्रास्ताविकातून 'दीक्षारंभ २०२६' या उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नर्सिंग शिक्षण, महाविद्यालयीन शिस्त, व्यावसायिक जबाबदाऱ्या आणि आरोग्यसेवेतील विविध संधींची ओळख करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

याप्रसंगी समर्थ कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य बाबासाहेब भुतकर, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या ऐश्वर्या गटकळ, यशवंत फापाळे, डॉ. शरद पारखे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा.निखिल कणसे, हर्षदा शिंदे, वैष्णवी बर्वे, स्वप्नाली गायकवाड, स्नेहल येवले,प्रा.कांचन साबळे यांनी केले.सानिया शेख यांनी सूत्रसंचालन केले, तर हर्षदा गोफने यांनी आभार मानले.नर्सिंग क्षेत्रातील ज्ञान, कौशल्य आणि सेवाभाव यांची सांगड घालून सक्षम व संवेदनशील आरोग्यसेवक घडविण्याच्या दृष्टीने 'दीक्षारंभ २०२६' हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

खामकरवाडी सोसायटीत नाहाटा-नागवडे युतीचा विजय!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : खामकरवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत नाहाटा-नागवडे युतीच्या किसान क्रांती समविचारी पॅनलने सर्वच्या सर्व १३ जागांवर विजय मिळवत ऐतिहासिक यश संपादन केले. या निवडणुकीत पॅनलने १३-० असा एकतर्फी विजय मिळवला असून पाचपुते गटाला एकही जागा जिंकता आली नाही. या निकालामुळे लोणी व्यंकनाथ परिसरातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांची चर्चा रंगली आहे.

या निवडणुकीत नाहाटा आणि नागवडे गटाने एकत्र येत किसान क्रांती समविचारी पॅनलच्या माध्यमातून ताकद दाखवून दिली. काही तांत्रिक अडचणींमुळे बाळासाहेब नाहाटा अटकेत असतानाही त्यांचे चिरंजीव मितेश नाहाटा यांनी पॅनलची धुरा सांभाळत नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुकीचे नेतृत्व केले. नागवडे गटाचे संचालक डी. आर. आबा काकडे आणि समविचारी आघाडीचे भूषण साळवे यांची साथ घेत त्यांनी विजयाचे अचूक नियोजन केले.

या निवडणुकीत काळे मुकिंदा दत्तात्रय, खेडकर सुनील रामदास, खोमणे संतोष रामचंद्र, गव्हाणे केशव सोपान, जगताप गोरख आबासाहेब, मगर किरण दत्तात्रय, साळवे दत्तू बाबू, ओव्हाळ सविता विठ्ठल, पिसे प्रमिला दिलीप, शेलार सविता संतोष, ओव्हाळ नीता सदाशिव, साळवे भूषण सुरेश आणि कोळपे संतोष चंदर हे तेरा उमेदवार विजयी झाले.

बाबुजी आव्हाड महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : बाबुजी आव्हाड महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने (एन. सी. सी.) भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात १७ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रदीपकुमार बेहरा व डम ऑफिसर कर्नल निकेत नेगी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील व श्रीतीलोक जैन विद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांची सायकल रॅली काढण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी सायकल राहिलेला हिरवा झेंडा दाखवून भारतामध्ये शांतता, एकता व अखंडता टिकवण्याची प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे असा संदेश दिला. भारत माता की जय, जय जवान जय किसान, वंदे मातरम यासारख्या विविध घोषणांनी शहर परिसर दुमदुमून टाकला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांना राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि देशाच्या अखंडतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

या कार्यक्रमास श्रीतीलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी, उपप्राचार्य भारत गाडेकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन अजयकुमार पालवे व चीप ऑफिसर बाळासाहेब गांगुर्डे यांनी केले.

नगरमधील जिल्हा कारागृहात कैद्यांचा राडा

पोलिसांना मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी; पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : येथील जिल्हा कारागृहात शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या कारागृह पोलीस कर्मचाऱ्यास कैद्यांनी शिवीगाळ करत अंगावर धावून जात जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी कारागृह पोलीस मयुर गोरख धामोरे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी पाच जणांविरोधात गंभीर गुन्हे दाखल केले आहेत.

मयुर गोरख धामोरे हे कारागृहात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून नोकरीस असून त्यांची नेमणूक सबजेल अहिल्यानगर येथे आहे. फिर्यादी कारागृहात आपली ड्युटी बजावत असताना बंदी निलेश बाळासाहेब जाधव हा बॅरेक क्रमांक तीनच्या पाण्याच्या टाकीच्या पाठीमागे लपलेला आढळला. त्यावेळी फिर्यादीने त्याला विचारणा केली असता त्याने अरेरावी करत शिवीगाळ केली आणि अधीक्षक कार्यालयाकडे नेत असताना इतर कैदी जमा झाले. त्यानंतर बंदी विजय राजु पठारे, गणेश उर्फ टिंग्या म्हसुदेव पोटे, मयुर अनिल आगे आणि अबुजर लतिफ राजे हे सर्वजण एकत्र आले.

आरोपींनी फिर्यादीला गांजा पिण्यास मज्जाव करत असल्याच्या कारणावरून अंगावर धावून जात मारहाण करण्याची धमकी दिली. आमच्यावर मोक्का आहे आणि आम्ही खाकी वर्दीला घाबरत नाही असे म्हणत आरोपींनी पोलीस कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली. तसेच बाहेर आल्यावर संपूर्ण कुटुंब संपवून टाकू आणि गोळ्या घालीन अशी गंभीर धमकी दिली. कारागृहातील इतर पोलीस कर्मचारी बीच बचाव करण्यासाठी आले असता त्यांनाही आरोपींनी धक्काबुक्की करत अंगावर धाव घेतली.



या प्रकरणी पोलीस नाईक मयुर धामोरे यांच्या फिर्यादीवरून निलेश बाळासाहेब जाधव, विजय राजु पठारे, गणेश उर्फ टिंग्या म्हसुदेव पोटे, मयुर अनिल आगे आणि अबुजर लतिफ राजे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील कायदेशीर तपास सुरू आहे.

सरकारी तलावांवर अतिक्रमणांचा विळखा

तलावांची मोजणी अन् अतिक्रमणे हटविण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ रस्त्यावर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : एकीकडे पाणीटंचाईचे संकट, दुसरीकडे गावातील सरकारी तलावांवर अतिक्रमणांचे सावट! भविष्यातील जलसाठ्याचे महत्त्व लक्षात घेऊन तलावांचे संरक्षण करण्याची मागणी वारंवार करूनही प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात नसल्याने महांडूळवाडी येथील ग्रामस्थांनी अखेर आरपारची लढाई सुरू केली आहे. सरकारी तलावांची अधिकृत मोजणी करून अतिक्रमणे हटवावीत, या मागणीसाठी सोमवार (दि. २ नोव्हेंबर) पासून ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे. प्रशासनाला दिलेली मुदत संपूनही कार्यवाही न झाल्याने आता मागण्यांवर निर्णय होईपर्यंत माघार न घेण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

महांडूळवाडी परिसरातील सरकारी तलावांवर अतिक्रमणे झाल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. या अतिक्रमणांमुळे तलावांचे मूळ क्षेत्र कमी होण्यासह नैसर्गिक जलप्रवाह आणि भविष्यातील पाणीसाठ्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात समस्त ग्रामस्थांच्या वतीने २६ ऑक्टोबर रोजी तहसीलदारांना लेखी निवेदन देण्यात आले होते. ३१ ऑक्टोबरपर्यंत तलावांची अधिकृत मोजणी पूर्ण करावी, मोजणीवेळी कोणाचाही दबाव अथवा हस्तक्षेप होऊ नये आणि आवश्यक पोलीस बंदोबस्त द्यावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली होती. मात्र, निर्धारित मुदत उलटूनही प्रत्यक्ष कार्यवाही सुरू न झाल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.



सात मागण्या; प्रशासनाकडे ग्रामस्थांचा ठाम सवाल!

महांडूळवाडीतील सर्व सरकारी तलावांची तातडीने अधिकृत मोजणी करावी, भूमिअभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत मोजणीची तारीख व वेळ लेखी कळवावी, मोजणीदरम्यान पोलीस बंदोबस्त ठेवावा, प्रक्रियेत अडथळे आणणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, मोजणीत निश्चित होणारी अतिक्रमणे तातडीने हटवावीत, तलावांचे मूळ क्षेत्र आणि नैसर्गिक पाण्याचे प्रवाह कायमस्वरूपी संरक्षित करावेत, तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत बैठक घेऊन संपूर्ण कार्यवाहीचे लेखी आश्वासन द्यावे, अशा सात प्रमुख मागण्यांवर ग्रामस्थ ठाम आहेत.

निवेदनांचा पाऊस, कारवाईचा दुष्काळ!

ग्रामस्थांनी यापूर्वी अनेकदा लोकशाही मार्गाने निवेदने देऊन प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, मोजणीची तारीख निश्चित नाही, अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही नाही आणि लेखी आश्वासनही नाही. त्यामुळे सरकारी तलावांच्या संरक्षणाबाबत प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.तलाव ही केवळ सरकारी मालमत्ता नसून गावाच्या भविष्यातील पाणी सुरक्षेची जीवनवाहिनी आहेत. आज अतिक्रमणांकडे दुर्लक्ष झाले, तर उद्या पाण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे केवळ कागदी आश्वासन नको, तर प्रत्यक्ष मोजणी आणि अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही सुरू करा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

आता प्रशासन काय भूमिका घेणार? ग्रामस्थांच्या आमरण उपोषणाची दखल घेऊन तहसील प्रशासन तातडीने मोजणीची तारीख जाहीर करणार की पुन्हा आश्वासनांवर वेळ काढणार, याकडे संपूर्ण महांडूळवाडीचे लक्ष लागले आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

मंगळवार, दि.०३ नोव्हेंबर २०२६ । पान ८

जिल्हा बँक निवडणुकीत आ. काळे व चैतालीताई काळेंनी केले मतदान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण २१ जागांपैकी ११ जागेवरील उमेदवार बिनविरोध निवडून आले असून उर्वरित १० जागांसाठी सोमवार (दि.०२) रोजी मतदान पार पडले. कोपरगाव शहरातील कोपरगाव नगरपालिकेच्या ०६ नंबर शाळेतील मतदान केंद्रावर जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील शेती पूरक मतदार संघातून सहकार विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आमदार आशुतोष काळे तसेच जिल्हा बँकेच्या माजी संचालिका चैतालीताई काळे यांनी मतदान केले.

श्रीरामपूर पालिकेतील गैरव्यवहारांची पुन्हा चौकशी

सोमनाथ जाधव, महेश कवटे अडचणीत? जिल्हाधिकाऱ्यांकडून सुधारित समिती नियुक्त



या तीन मुद्द्यांवर होणार चौकशी

१. तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांची बँकेतील रक्कम हस्तांतर आणि बायोमायनिंग या दोन्ही प्रकरणांतील प्रशासकीय भूमिका, सहभाग, दुर्लक्ष व कर्तव्यकसुरीबाबत स्पष्ट अहवाल.

२. तत्कालीन लेखापाल महेश कवटे यांच्याबाबत यापूर्वीच्या चौकशीत राहिलेल्या मुद्द्यांचा तपास.

३. कंपोस्ट डेपो येथील मंजूर निधीतून राबविण्यात आलेल्या कचरा बायोमायनिंग प्रकल्पाचे विशेष लेखापरीक्षण करून तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, लेखापाल महेश कवटे आणि आरोग्य अधिकारी दीपक खोब्रागडे यांच्याबाबत स्पष्ट अहवाल.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : श्रीरामपूर नगरपालिकेतील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि प्रशासकीय अनियमिततांच्या चौकशीला आता पुन्हा गती मिळाली आहे. तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, तत्कालीन लेखापाल महेश कवटे आणि आरोग्य अधिकारी दीपक खोब्रागडे यांच्याशी संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने सुधारित चौकशी समिती नियुक्त केली आहे. विशेष म्हणजे, यावेळी बँक खात्यातील रक्कम हस्तांतर, बायोमायनिंग प्रकल्पातील निधी आणि संबंधित अधिकाऱ्यांची प्रशासकीय भूमिका या मुद्द्यांचा स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे. समितीला सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगरपालिकाशाखेने काढलेल्या सुधारित आदेशानुसार श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी किरण सावंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. देवळाली प्रवरा नगरपालिकेचे लेखापाल स्वप्नील फड आणि पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता निखिल नवले हे समितीचे सदस्य असणार आहेत.

या प्रकरणात यापूर्वीही अनेकदा चौकशी समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या. मार्च २०२५ मध्ये तत्कालीन लेखापाल महेश कवटे यांच्याविरोधातील तक्रारींच्या अनुषंगाने पहिली समिती नियुक्त झाली. त्यानंतर तक्रारींचा व्याप वाढल्याने संगमनेर, देवळाली प्रवरा आणि उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वेगवेगळ्या टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने २८ जुलै २०२६ रोजी अहवाल सादर केला होता. त्यानंतर महेश कवटे यांच्याविरोधात विभागीय चौकशीची शिफारस नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आली होती.

मात्र, तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांच्या भूमिकेबाबत स्वतंत्र चौकशी व्हावी, तसेच बायोमायनिंग प्रकल्पातील मंजूर निधीचे विशेष लेखापरीक्षण करावे, अशी मागणी तक्रारदार शिवसेनेचे शिर्डी लोकसभा जिल्हाप्रमुख राजेंद्र पाटील देवकर यांनी सातत्याने केली होती. यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणही केले होते. आश्वासनानंतर उपोषण स्थगित केले असतानाही ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला होता.

दरम्यान, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी चौकशी समितीचे सदस्य सचिव स्वप्नील फड यांनी बायोमायनिंग प्रकल्पाचे विशेष लेखापरीक्षण हा विषय समितीच्या कार्यकक्षेत नसल्याचे कळविले होते. त्यामुळे या महत्त्वाच्या मुद्द्याची चौकशीच झाली नसल्याचे समोर आले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने नव्याने सुधारित समिती नियुक्त करण्यात आली आहे. आता नव्याने नियुक्त समितीच्या चौकशीत तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांची भूमिका स्पष्ट होणार का, बायोमायनिंग प्रकल्पाच्या निधीचे विशेष लेखापरीक्षण होणार का आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची शिफारस होणार का, याकडे श्रीरामपूरकरांचे लक्ष लागले आहे. वारंवार समित्या नियुक्त होऊनही अद्याप प्रकरणाचा अंतिम निकाल लागलेला नसल्याने या सात दिवसांच्या मुदतीतील चौकशी अहवालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

९२ लाख शेतकऱ्यांचे लक्ष शासनाच्या निर्णयाकडे

मदत रखडल्याने शेतकरी आर्थिक संकटात

विशेष वृत्त । राष्ट्र सह्याद्री

ममदापूर : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे थकीत हप्ते कधी मिळणार, हा प्रश्न आता राज्यातील लाखो शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. शेतीतील सततचे नुकसान, दुष्काळाचे सावट, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणी यामुळे शेतकरी आधीच संकटात असताना शासनाच्या या आर्थिक मदतीकडे बळीराजा डोळे लावून बसला आहे.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये तीन समान हप्त्यांमध्ये दिले जातात. म्हणजेच प्रत्येक चार महिन्यांनी २ हजार रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणे अपेक्षित आहे. मात्र, मार्च २०२६ मध्ये आठवा हप्ता वितरित झाल्यानंतर पुढील हप्त्यांची प्रतीक्षा कायम आहे.

माध्यमांमधील उपलब्ध माहितीनुसार, नववा आणि दहावा हप्ता असे दोन हप्ते प्रलंबित असून, पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी २ हजार रुपयांप्रमाणे एकूण ४ हजार रुपये मिळणे अपेक्षित आहे. या निधीसाठी सुमारे ३,७०० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे वृत्त आहे.

पीएम किसानचा हप्ता आला, मग नमोचा कधी?

३० ऑक्टोबर २०२६ रोजी केंद्र सरकारकडून पीएम किसान सन्मान निधीचा २४ वा हप्ता वितरित करण्यात आला. मात्र, राज्य सरकारच्या नमो शेतकरी योजनेच्या पुढील हप्त्याबाबत अद्याप निश्चित तारीख जाहीर झालेली नसल्याची माहिती समोर आली आहे.

२७ ऑक्टोबर रोजी शेतकरी प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमो योजनेचे हप्ते शेतकऱ्यांना दिले जातील, असे सांगितल्याचे वृत्त आहे. मात्र, प्रत्यक्ष पैसे खात्यात कधी जमा होणार, याबाबत शेतकऱ्यांना स्पष्ट उत्तर मिळालेले नाही.

दुष्काळात शेतकऱ्यांना पैशांची गरज; चार हजार रुपये कधी मिळणार?

यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे अनेक भागांतील शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. पेरणी, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीसाठी केलेला खर्च वसूल होणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत नमो शेतकरी योजनेचे थकीत पैसे मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळू शकतो.

एकीकडे शासनाकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी ५ हजार रुपयांच्या अग्रीम मदतीची घोषणा करण्यात आली आहे, तर दुसरीकडे आधीपासूनच मिळणे अपेक्षित असलेल्या नमो शेतकरी योजनेच्या हप्त्यांची प्रतीक्षा सुरू आहे.

शेतकऱ्यांचा शासनाला सवाल!

नमो शेतकरी योजनेचे थकीत हप्ते नेमके कधी वितरित होणार? निधी मंजुरीची प्रक्रिया कुठपर्यंत आली आहे? पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात चार हजार रुपये कधी जमा होणार? शासनाने याबाबत स्पष्ट तारीख जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

बळीराजाला केवळ घोषणांची नव्हे, तर प्रत्यक्ष आर्थिक मदतीची गरज आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेत पैसे जमा झाले, तरच या योजनांचा खरा उद्देश साध्य होईल.

अळकुटी येथील घोलप मळ्यात ७० लाखांची चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

निघोज : पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील घोलप मळ्यात यशवंत बाळाजी घोलप यांच्या घरी चोरट्यांनी कपाट फोडून ३१ तोळे सोने ५० तोळे चांदी असा जवळपास ७० लाख रुपयांचा एवज तसेच रोख २ लाख २५ हजार रुपये रोख अशी मोठी चोरी झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही चोरी मध्यरात्री १२ ते ३ दरम्यान झाली असल्याची माहिती प्रशांत यशवंत घोलप यांनी दिली आहे. याबाबत पारनेर पोलिस स्टेशनला मंगल घोलप यांनी फिर्याद दाखल केली आहे. याबाबत पारनेरचे पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी घोलप मळ्यात चोरीच्या ठिकाणी सोमवार दि.२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता भेट देऊन पाहाणी केली.

यावेळी ठसेतज्ञ तसेच गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी व पोलीस यांनी प्रत्यक्ष पाहाणी करीत चोरीची माहिती घेतली याबाबत चोरांचा शोध घेण्यासाठी विविध भागात पथके पाठवली आहेत. घोलप मळ्यात यशवंत घोलप हे राहात असून घरामध्ये दोन ते तीन खोल्या आहेत. मेन दरवाजाची कडी काढून चोरटे घरामध्ये शिरले मात्र ज्या ठिकाणी कपाट आहे. त्याच ठिकाणी आठ दिवसांपूर्वी काढलेले सोयाबीन ठेवण्यात आले होते.



त्या खोलीत कुणीच नव्हते चोरट्यांनी बरोबर हीच संधी साधून या खोलीतील कपाट फोडले व त्यातील वरील ऐवज व रोख रक्कम चोरुन नेली आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत पोलिस बंदोबस्त असल्याने पोलीस घटनास्थळी उशिरा आले आहेत. ठसे तज्ञ तसेच गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधिकारी दुपारी तीन वाजताच या ठिकाणी येऊन गेले त्यांनी सविस्तर माहिती घेऊन चोरीचा तपास सुरू केला आहे. अळकुटी येथे प्रथमच एवढी मोठी चोरी झाल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. या चोरीचा तातडीने तपास करुन चोरट्यांना पकडण्यात यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

रक्तरंजित संघर्षाचे आरोपी अजूनही मोकाट ; पोलिसांची दोन पथके शोधात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : शहरात भरवस्तीत कोयते आणि लोखंडी कत्त्यांनी दोन गटांत रक्तरंजित संघर्ष घडवून आणणारे आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. गंभीर हल्ला, अनेक जखमी आणि दोन्ही बाजूंनी दाखल झालेल्या परस्परविरोधी तक्रारी अशा पार्श्वभूमीवर गुन्ह्याचा तपास सुरू असला तरी अटकेच्या बाबतीत पोलिसांना अद्याप यश आलेले नाही. आरोपींच्या शोधासाठी दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, ती विविध ठिकाणी त्यांचा माग काढत आहेत. मात्र, शस्त्रांचा उघडपणे वापर करून दहशत निर्माण करणारे आरोपी अजूनही मोकाट असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे.

या घटनेनंतर नागरिकांनीही तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. घटनेचे स्वरूप आणि हल्ल्याची पद्धत पाहता अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. काही वाचकांनी नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर, प्रत्यक्ष घडलेला संघर्ष अत्यंत भयावह असल्याचे सांगितले. शहरात अशा प्रकारे शस्त्रे घेऊन गटागटांत हल्ले होत असतील, तर सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही उपस्थित होत आहे.

दोन पथके मैदानात, तरी आरोपी मोकाट!

प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी विनय सोनवणे यांना याबाबत विचारले असता, अद्याप एकाही आरोपीला अटक झालेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरोपींचा कसून शोध घेण्यासाठी दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, ही पथके विविध ठिकाणी फिरून संशयितांचा शोध घेत आहेत. पोलिसांकडून शोधमोहीम सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्ष अटकेची प्रतीक्षा कायम आहे.

त्यामुळे तपासाची गती आणि आरोपींच्या अटकेबाबत नागरिकांमध्ये उत्सुकतेसोबतच प्रश्नही निर्माण झाले आहेत.

जखमींच्या जबाबातून उघड होणार पडद्यामागचे वास्तव?

या प्रकरणातील तपासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे जखमींचे जबाब. जखमी पूर्णपणे शुद्धीवर आल्यानंतर त्यांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात येणार आहेत.

त्यातून हल्ल्याची सुरुवात नेमकी कशी झाली, कोणत्या व्यक्तींनी प्रत्यक्ष सहभाग घेतला, हल्ल्यापूर्वी काही नियोजन झाले होते का आणि या संघर्षामागे आणखी काही कारण आहे का, याचे धागेदोरे मिळू शकतात.

जखमींच्या जबाबानंतर गुन्ह्याच्या तपासाला नवे वळण मिळण्याची शक्यता असून, सध्या समोर आलेल्या माहितीतून अधिक गंभीर बाबी उघड होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

शहराच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

गणेश विसर्जनाच्या वादातून सुरू झालेला संघर्ष थेट शस्त्रांच्या वापरापर्यंत पोहोचला. दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी तक्रारी दाखल झाल्याने नेमकी वस्तुस्थिती तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. मात्र, अशा प्रकारच्या हिंसक घटनांमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.आरोपींचा शोध सुरू आहे, पथके तैनात आहेत आणि तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून दिली जात आहे. परंतु नागरिकांना अपेक्षा आहे ती प्रत्यक्ष कारवाईची. हल्ल्यात सहभागी असलेल्या प्रत्येकाला शोधून अटक होणार का? या संघर्षामागील संपूर्ण साखळी उघड होणार का? आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार का? या प्रश्नांची उत्तरे आता पोलिसांच्या कारवाईतूनच मिळणार आहेत.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; ९९.२७ टक्के मतदान

पाच तालुक्यांत शंभर टक्के मतदान; आता मतमोजणीकडे लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये पार पडलेल्या मतदानात मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने जाहीर केलेल्या अंतिम आकडेवारीनुसार, जिल्ह्यात एकूण ९९.२७ टक्के मतदान झाले आहे. जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या मतदारांचा हा विक्रमी प्रतिसाद मानला जात आहे. एकूण ३ हजार ८४७ मतदारांपैकी ३ हजार ८०९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, तर केवळ ३८ मतदार मतदानापासून दूर राहिले.

जिल्ह्यातील अकोले, नेवासा, पाथर्डी, श्रीगोंदा आणि श्रीरामपूर या पाच तालुक्यांनी शंभर टक्के मतदानाची नोंद केली. अकोले येथे २३१, नेवासा येथे २४६, पाथर्डी येथे १३१, श्रीगोंदा येथे २९९, तर श्रीरामपूर येथे १४७ मतदारांनी मतदान केले. या पाचही तालुक्यांत एकही मतदार अनुपस्थित राहिला नाही.

संगमनेर तालुक्यात ७१५ पैकी ७१४ मतदारांनी मतदान केले. त्यामुळे येथे ९९.८६ टक्के मतदान झाले. कोपरगावमध्ये ५२९ पैकी ५२० (९८.३० टक्के), जामखेडमध्ये ११५ पैकी ११४ (९९.१३ टक्के), कर्जतमध्ये १६८ पैकी १६७ (९९.४० टक्के), पारनेरमध्ये २२७ पैकी २२५ (९९.१२ टक्के), नगरमध्ये ३९१ पैकी ३८७ (९८.९८ टक्के), राहातामध्ये २६३ पैकी २६० (९८.८६ टक्के), शेवगावमध्ये ११७ पैकी ११५ (९८.२९ टक्के), तर राहुरी तालुक्यात २५८ पैकी २५३ मतदारांनी मतदान केले. राहुरीतील मतदानाची टक्केवारी ९८.०६ इतकी राहिली. दरम्यान, संगमनेर येथील मतदान केंद्रावर मतपत्रिकेचे चित्रण केल्याच्या प्रकरणी संगमनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील सर्व ३३ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. उच्चांकी मतदानामुळे निवडणुकीतील चुरस वाढली असून, आता सर्वांचे लक्ष मतमोजणीच्या निकालाकडे लागले आहे. प्रशासनाकडून मतमोजणीची तयारी सुरू करण्यात आली आहे.

गोदावरी खोऱ्यातील नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य

मराठवाड्याची पाणीटंचाई दूर करणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : मराठवाड्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी गोदावरी खोऱ्यात अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देणाऱ्या नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध पाण्याची साठवणूक आणि ते संबंधित भागांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारण्याचे नियोजन सुरू असल्याची माहिती जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयात कालवा सल्लागार समितीच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. जायकवाडी प्रकल्पात सध्या सुमारे ५८ टीएमसी जलसाठा असून, उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिले जात आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले. जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून पाणी वितरण करताना सुमारे ४० टक्के पाणीहानी होत आहे.



उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणामुळे दोन टीएमसी पाण्याची बचत झाली असून, डाव्या कालव्यातील पाणीहानी कमी करण्यासाठीही सुधारणा करण्यात येणार आहेत. कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी पाणी वितरणात शिस्त राखण्यासह आवश्यक पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी मान्य करण्यात आली आहे.

गोदावरी खोऱ्यात अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित नदीजोड प्रकल्पांचे पहिले सर्वेक्षण पूर्ण झाले असून, सुमारे ९१ टक्के पाणी उपलब्ध होण्याचा अंदाज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या प्रकल्पांना गती मिळाली आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचाही दुष्काळी भागांना लाभ होणार आहे. केवळ पाणी उपलब्ध करून न थांबता त्याच्या साठवणुकीसह वितरणाची सक्षम व्यवस्था उभारण्यावर शासनाचा भर आहे. कालव्यांमधील पाणीहानी रोखणे आणि नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून दुष्काळी भागांना शाश्वत पाणी उपलब्ध करून देणे, हे शासनाचे उद्दिष्ट असल्याचे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या नेवासा केंद्रात १०० टक्के मतदान!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी नेवासा मतदान केंद्रावर उत्साहपूर्ण वातावरणात १०० टक्के मतदान झाले. एकूण २४६ मतदारांपैकी सर्वच्या सर्व २४६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी आठ ते दुपारी चार या वेळेत मतदानाची अधिकृत वेळ असताना दुपारी सव्वातीन वाजताच शेवटच्या मतदाराने मतदान केल्याने निर्धारित वेळेच्या तब्बल ४५ मिनिटे आधीच मतदान प्रक्रिया पूर्ण झाली.

नेवासा शहरातील जिल्हा परिषद मराठी शाळेत दोन मतदान केंद्रांवर ही मतदान प्रक्रिया पार पडली. विविध कार्यकारी सेवा संस्थांचे



१३०, बिगरशेती संस्थांचे ९१ आणि कृषी मतदारसंघातील २५ मतदार अशा एकूण २४६ मतदारांचा यामध्ये समावेश होता. प्रत्येक मतदाराला दहा मते द्यायची असल्याने मतदान प्रक्रियेत विशेष काळजी घेण्यात आली.

या मतदान प्रक्रियेदरम्यान माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार सदाशिव लोखंडे, आमदार विठ्ठलराव लंघे, उदयन गडाख, सुनीताताई गडाख, विश्वासमामा गडाख, माजी आ, पांडुरंग अभंग, माजी आ, बाळासाहेब मुरकुटे, रत्नमाला लंघे, माजी आमदार नरेंद्र घुले, ऋषिकेश ढाकणे, विद्याधर काकडे तसेच शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष रामदास गोल्हार माजी नगरसेवक रणजीत सोनवणे यांच्यासह विविध मान्यवरांनी मतदानाचा हक्क बजावला.

संपूर्ण मतदान प्रक्रियेत मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. निर्धारित वेळेपूर्वीच सर्व २४६ मतदारांचे मतदान पूर्ण झाल्याने नेवासा केंद्रावर शंभर टक्के मतदानाची नोंद झाली. सहकार क्षेत्रातील या महत्त्वपूर्ण निवडणुकीच्या निकालाकडे आता तालुक्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. शेवटचं मतदान तरकसे मोहिनी यांनी केले.